**जयपूर :** क्रिकेट जगतातील किंग विराट कोहलीने टी-२० क्रिकेटच्या छोट्या प्रारुपात मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. आयपीएल स्पर्धेत रविवारी जयपूरच्या मैदानात रंगलेल्या राजस्थान रॉयल्स विरुद्धच्या सामन्यात त्याने अर्धशतकी खेळी साकारली. या अर्धशतकासह टी-२० क्रिकेटमध्ये १०० शतके झळकावणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला. डेविड वॉर्नरनंतर अशी कामगिरी करणारा तो दुसरा फलंदाज आहे. ऑस्ट्रेलियन स्फोटक फलंदाज डेविड वॉर्नर याने सर्वात आधी टी-२० क्रिकेटमध्ये अर्धशतकांची शंभरी साजरी केली होती. त्याच्या खात्यात टी-२० क्रिकेटमध्ये १०९ शतकांची नोंद आहे. राजस्थान संघाने दिलेल्या १७४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना विराट कोहलीने ३९ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकाराच्या मदतीने अर्धशतक साजरे केले.

वर्ष ५७ वे । अंक २६६ वा । पाने ६ । किंमत २ रुपये

दैनिक सत्यप्रभा

बातम्यांसोबत विचार देणारे

सोमवार, दि. १४ एप्रिल २०२५

PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026

epaper.satyaprabha.com

dainiksatyaprabha2015@gmail.com

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील गरजू नागरिक आपल्या अडचणी घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयात येतात. मात्र, विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी गरजू नागरिकांशी ऑनलाईन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा उपक्रम हाती घेतला आहे. १५ एप्रिल रोजी सायंकाळी पाच वाजता नगरपालिका क्षेत्रात वॉर्ड भेट समस्या समाधान अभियानाच्या माध्यमातून नागरिकांशी ते संवाद साधणार आहेत. याबाबतचा क्युआर कोडही प्रसिद्ध करण्यात आला असून नागरिकांना आपल्या मोबाईलवरुन या उपक्रमात सहभागी होता येणार आहे. उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे, देविदास टेकाळे यावेळी उपस्थित असणार आहेत.



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांची आज जयंती. त्यानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.

दैनिक सत्यप्रभा

**सुट्टीची सूचना**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. १४ एप्रिल रोजी दै. सत्यप्रभा कार्यालयास सुट्टी असल्याने दि. १५ एप्रिलचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते, जाहिरातदारांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**

### विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांची ग्वाही

# वंचित, उपेक्षित, गरीब, शोषितांना न्याय देणार

**नांदेड, दि. १३ :** सभापतीपद हे संवैधानिक असून ते मोठे आहे. पदाची गरिमा आहे. या पदाचा समाजातील उपेक्षित, वंचित, शोषित, गरीबांना न्याय देण्यासाठी तसेच समाजाला, पदाला, पक्षाला न्याय देण्याचे काम करण्यासाठी उपयोग करणार असल्याचे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.

शहरातील कौठा भागातील मातोश्री मंगल कार्यालयात रविवारी विधानपरिषदेचे सभापती झाल्याने प्रा. राम शिंदे यांचा धनगर समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर, *(पान दोनवर)*



### धनगर समाजाचे प्रश्न सोडवू : खा. चव्हाण

खा. अशोकराव चव्हाण म्हणाले, की मराठा आणि धनगर समाजाच आरक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. राजकीय इच्छाशक्ती असली की कायदेशीर मार्गाने सर्व प्रश्न सुटणार आहेत. धनगर समाजातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांना आरक्षण नसताना देखील जिल्हा परिषद अध्यक्ष, सदस्य, नगरसेवक, सभापतीपदाची संधी देत न्याय दिला. यापुढे देखील धनगर समाजाच्या प्रश्नांबाबत खंबीर असल्याचे *(पान दोनवर)*

### आ. कल्याणकरांची घेतली फिरकी

नांदेड येथील कृषी महाविद्यालय मंजूर करण्यासंदर्भात मुख्य सचिवांनी खोडा घातला म्हणून मी मंत्री असताना शेवटच्या मंत्रिमंडळ बैठकीत ही फाईल मंजूर झाली नाही. प्रस्तावापासून अखेरपर्यंत पाठपुरावा होता. मात्र, सरकार पडले. त्यानंतर शेवटची मुख्यमंत्री शिंदे यांची स्वाक्षरी घेऊन कृषी महाविद्यालय मंजूर झाले. पण सर्व सोपस्कार मी पूर्ण केल्याचे सांगत श्रेय घेणाऱ्या आ. कल्याणकर यांची खा. चव्हाण यांनी यावेळी फिरकी घेतली.



**नांदेड :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सोमवारी (दि. १४ एप्रिल) जयंती आहे. जयंतीनिमित्त रेल्वेस्थानकासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा आणि परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. (छायाचित्र : करणसिंह बैस)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उत्साह

### आज मिरवणुकीसह विविध कार्यक्रम : अडीच हजार पोलिसांचा बंदोबस्त

**नांदेड, दि. १३ :** शहरासह संपूर्ण जिल्हाभरात सोमवारी (१४ एप्रिल) साजरा होणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उत्साहाचे वातावरण आहे. तसेच शहरात १५८ अधिकाऱ्यांसह अडीच हजार पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिली. सोमवारी निघणाऱ्या मिरवणुका शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा पोलीस दलाच्या वतीने प्रतिबंधात्मक



कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत ४०० जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

शहरात सुमारे २०० सार्वजनिक भीमजयंती मंडळाकडून विविध भागातून मिरवणुका काढण्यात येणार आहेत. या मिरवणुकीमध्ये वेगवेगळे देखावे सादर केले जाणार आहेत. या देखाव्याची तसेच मिरवणूक मार्गाची माहिती पोलीस दलाच्या वतीने घेतली आहे. त्याचवेळी सर्व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचे संपर्क पोलीस दलाकडे उपलब्ध असून बीटमधील पोलीस कर्मचारी या मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी रविवारी सायंकाळपासून संपर्कात होते. जिल्ह्यातील मिरवणुकीच्या बंदोबस्त अनुषंगाने पोलीस अधिकारी/अंमलदारांची रंगीत तालीम घेऊन योग्य त्या सूचना व मार्गदर्शन *(पान दोनवर)*

### सामान्य नागरिकांचे वीज बिलही कमी होणार : मुख्यमंत्री

# २०२६ अखेर शेतकऱ्यांना १२ तास मोफत वीज देणार

**वर्धा, दि. १३ :** डिसेंबर २०२६ पर्यंत राज्यातील ८० टक्के शेतकऱ्यांना वर्षभर १२ तास मोफत वीज उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच येत्या पाच वर्षांत राज्यात सामान्य नागरिकांचे वीज बील दरवर्षी कमी होणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आर्वी येथे विविधविकास कामांच्या लोकार्पण व भूमिपूजन प्रसंगी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आर्वी येथील नवीन प्रशासकीय इमारतीचे लोकार्पणासह ७२० कोटींच्या विकासकामांचे ई-लोकार्पण व भूमिपूजन झाले. यावेळी ते बोलत होते. गृह राज्यमंत्री *(पान दोनवर)*

# पैनगंगा प्रकल्पग्रस्तांना वाढीव मोबदला मिळणार

**नांदेड, दि. १३ :** नांदेड आणि यवतमाळ जिल्ह्यातील बहुचर्चित निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या (चिमटा धरणा) विस्तारीकरणासाठी स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनींचे २००८ ते २०१० मध्ये वाटाघाटीने भूसंपादन करण्यात आले होते. तब्बल १६ वर्षे उलटूनही शेतकऱ्यांना योग्य मोबदला न मिळाल्याने शेतकरी वाढीव मोबदल्याची मागणी करीत होते. अखेर निम्न पैनगंगा प्रकल्पासाठी वाटाघाटीने भूसंपादन केलेल्या जमिनींचा पाच लाख रुपये हेक्टरप्रमाणे वाढीव मोबदला जलसंपदा *(पान दोनवर)*



## सं । क्षि । प्त

### ठाकरे गटाच्या प्रवक्त्या संजना घाडी शिवसेनेत

**मुंबई :** उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या प्रवक्ता संजना घाडी आणि त्यांचे पती संजय घाडी यांनी ठाकरे गटाला जय महाराष्ट्र करुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केला आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाला हा मोठा हादरा मानला जात आहे. संजना घाडी मुंबईतील ठाकरे गटाच्या महत्त्वाच्या नेत्या मानल्या जातात. त्या माजी नगरसेविका असून शिवसेनेच्या उपनेत्या आहेत. काही दिवसांपूर्वी ठाकरे गटाकडून प्रवक्त्यांची यादी जाहीर करण्यात आली होती. या यादीत संजना घाडी यांचे नाव नव्हते. त्यामुळे त्या नाराज असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. नंतर शेवटच्या क्षणी संजना घाडी यांचे नाव प्रवक्तेपदी जाहीर करण्यात आले होते. त्यानंतरही त्यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देत शिवसेनेत प्रवेश केला आहे.

### आयपीएस अधिकाऱ्यावर अत्याचाराचा गुन्हा दाखल

**नागपूर :** नागपूरमधील एका आयपीएस अधिकाऱ्या विरोधात बलात्काराचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. इमामवाडा पोलीस ठाण्यात एका महिला डॉक्टरने या ३० वर्षीय आयपीएस अधिकाऱ्याविरोधात बलात्काराची तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला आहे. आयपीएस अधिकारी आणि महिला डॉक्टरची ओळख २०२२ मध्ये पहिल्यांदा इंस्टाग्रामच्या माध्यमातून झाली होती. त्यावेळी तो शासकीय नोकरीत नव्हता. याच दरम्यान लग्नाचे आश्वासन देऊन या अधिकाऱ्याने वेगवेगळ्या ठिकाणी शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप या महिला डॉक्टरने तिच्या तक्रारीत केला आहे. नंतर तो यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन आयपीएस अधिकारी झाला आणि त्याने लग्नास नकार दिला. झी २४ तास मराठीने हे वृत्त दिले आहे.

### वैद्यकीय महाविद्यालयातील महिला प्रोफेसरची हत्या

**नागपूर :** नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील फिजिओथेरपी विभागाच्या असिस्टंट प्रोफेसर अर्चना अनिल राहुले यांचा खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. त्यांचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह घरात आढळल्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. प्राथमिक तपासात डोक्यावर रॉडने वार करून त्यांचा खून करण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून हुडकेश्वर पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा करून तपास सुरू केला आहे. अर्चना यांचे पती अनिल राहुले हेही रायपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रोफेसर आहेत. ते आठवड्यातून एक-दोन दिवस नागपुरात येत असतात. शनिवारी सायंकाळी अनिल नागपूरला घरी आल्यानंतर ही घटना उघडकीस आली.

### म्यानमारमधील ६० भारतीय सायबर गुलामांची सुटका

**नवी दिल्ली :** विदेशात नोकरीचे प्रलोभन दाखवत सायबर गुलाम बनविलेल्या ६० भारतीयांची म्यानमारमधून सुटका करण्यास महाराष्ट्र सायबरला यश आले आहे. याप्रकरणी राज्य सायबरने तीन गुन्हे नोंदवत ५ आरोपींना अटक केली. या तरुणांनी कामाला नकार दिल्यामुळे त्यांचा शारिरीक छळ करण्यात आला. काहींच्या बोटाची नखे उखडून टाकली तसेच काही तरुणांना विजेचा शॉक दिल्याचे उघड झाले. काही तरुणांनी कुटुंबीयांशी संपर्क साधत येथून सुटका करण्याची विनंती केली. त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी पोलिसांकडे मदतीची मागणी केली. या प्रकरणी महाराष्ट्र सायबर पोलिसांनी केंद्र सरकारच्या मदतीने ऑपरेशन राबवत एकूण ६० जणांची सुखरूप सुटका केली आहे.

### ताजिकिस्तानात २४ तासांत ६.१ रिश्टर स्केलचे धक्के

**नवी दिल्ली :** म्यानमार, थायलंड आणि शनिवारी पाकिस्तानातील भूकंपाचे वृत्त ताजे असतानाच ताजिकिस्तानमध्ये रविवारी एका तासांत दोन भीषण भूकंपाचे धक्के जाणवले. पहिला धक्का ६.१ रिश्टर स्केल तीव्रतेचा होता. भूकंपाच्या धक्क्यामुळे लोक त्यांच्या घरातून बाहेर पडले. अद्याप यात कुठल्याही मोठ्या दुर्घटनेचे आणि जीवितहानीची माहिती नाही. भूकंपाचा केंद्रबिंदू ताजिकिस्तानच्या डोंगराळ भागात असल्याचे सांगण्यात येत आहे. ताजिकिस्तानमध्ये शनिवारी दुपारी साडेबारा वाजता भूकंप आला होता. त्याची तीव्रता ४.२ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. २४ तासांत दुसऱ्यांदा भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. शनिवारी दुपारी जम्मू-काश्मीरशिवाय पाकिस्तान, ताजिकिस्तान, टोंगा, पपुआ न्यू गिनी या भागात भूकंपाचे धक्के बसले.

### ८१३ किलोंचा अंमली पदार्थांचा साठा नष्ट

**सांगली :** सांगली पोलिसांनी तब्बल ८४ लाखांचा अंमली पदार्थाचा साठा नष्ट केला. ८१३ किलो वजनाचा हा अंमली पदार्थाचा साठा होता. ज्यात कोकेन, ब्राऊन शुगर, गांजा अशा अंमली पदार्थांचा समावेश होता. जिल्ह्यातील नऊ पोलीस ठाण्यांतर्गत १९८६ पासून २०२४ पर्यंत १७ गुन्ह्यात करण्यात आलेल्या कारवाईमध्ये हा नशेचा साठा जप्त करण्यात आला होता.

# सोने गाठणार लाखाचा टप्पा?

## बाजारातील अस्थिरतेमुळे दोन मतप्रवाह

**नवी दिल्ली, दि. १३ :** जागतिक स्तरावर सुरु असलेल्या व्यापारयुद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतीय सराफा बाजारात सध्या कमालीची अस्थिरता निर्माण झाली आहे. सोने-चांदीच्या भावात रोज चढ-उतार होत आहेत. दिल्लीतील सराफा बाजारात शुक्रवारी सोन्याचा भाव १० ग्रॅमला ६,२५० रुपयांनी वाढला आणि ९६,४५० रुपयांवर म्हणजे आतापर्यंतच्या उच्चांकी पातळीवर पोहोचला आहे. तज्ज्ञांच्या मते, सोन्याच्या भावात आणखी वाढ होऊन एका आठवड्यात प्रति १० ग्रॅम एक लाख रुपयांपर्यंत पोहोचू शकते.

यावर्षी म्हणजे २०२५ मध्ये सोन्याने आतापर्यंत २० वेळा उच्चांकी पातळी गाठली आहे. अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापार युद्धामुळे लोक सोन्याला सुरक्षित गुंतवणूक मानत आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातही सोन्याचा भाव वाढला आहे. याचा परिणाम देशांतर्गत बाजारातही दिसत आहे. भू-राजकीय अनिश्चितता, सेंट्रल बँकांनी केलेली खरेदी आणि व्याजदरात कपात होण्याची शक्यता यामुळे सोन्याच्या भावाला आणखी चालना मिळत आहे. जागतिक स्तरावरही सोन्याच्या भावात मोठी वाढ झाली आहे. स्पॉट सोन्याचा भाव पहिल्यांदाच ३,२०० डॉलर प्रति औंसच्या पुढे गेला आहे. अमेरिकन गोल्ड फ्युचर्स ३,२३७.५० डॉलर प्रति औंसवर आहे. (एक औंस म्हणजे २८.३४ ग्रॅम) सोन्याच्या भावात होत असलेल्या वाढीमुळे ते एका आठवड्यात एक लाख रुपयांवर पोहोचू शकते, असा अंदाज आहे. अमेरिकेची सेंट्रल बँक फेडरल रिझर्व्ह २०२५ मध्ये दोन वेळा व्याजदर कमी करू शकते. त्यामुळे सोने एक लाखापर्यंत पोहोचू शकते, असे म्हटले जात आहे. दुसरीकडे, काही तज्ज्ञांचे मत आहे, की सोन्याला एक लाख रुपयांच्या पातळीवर पोहोचण्यासाठी बराच वेळ लागेल. काही जाणकारांचे म्हणणे आहे की, सोन्यातील वाढ ही सध्याच्या ट्रेंडचा विस्तार आहे, नवीन तेजीची सुरुवात नाही. कोणत्याही नवीन कारणाशिवाय पुढच्या आठवड्यात सोन्याचा भाव एक लाखाचा आकडा गाठणे कठीण आहे.



## महागाईमुळे बदलला ट्रेंड

### वधुच्या सोन्याच्या दागिन्यांसाठी जुनी मोड कामाला

**मुंबई, दि. १३ :** लग्नसराईचा हंगाम सुरू होण्यापूर्वीच यंदा देशातील सराफा बाजारात सोन्याने विक्रमी झेप घेतली आहे. सोने आणि चांदीच्या किंमतींनी आकाशाला गवसणी घातली. वाढत्या ट्रेड वॉरमुळे सराफा बाजारात सोन्याच्या किंमती शुक्रवारी ६,२५० रुपयांनी उसळल्या. सोने ९६,४५० रुपये प्रति १० ग्रॅमच्या विक्रमी उच्चांकावर पोहचले. सराफा बाजारात सोने महागल्याने लग्नात वधूच्या दागिने खरेदीचा नवीन ट्रेंड सुरू झाला आहे. अनेक लोक जुने शिक्के, दागदागिने, तुकडे विक्री करून नवीन दागिने खरेदी करत आहेत.

मुंबई बुलियन असोसिएशनचे सदस्य आणि व्यावसायिक संजय कोठारी यांच्या मते, सोन्याच्या किंमती सध्या उच्चांकावर आहेत. लग्न सोहळ्यांमुळे ८० टक्क्यांहून अधिक लोक जुने सोने मोडून नवीन सोने खरेदी करत आहेत. यामुळे त्यांच्या खिशाला जास्त आर्थिक भुर्दंड बसत नाही. त्यांना केवळ मेकिंग चार्ज द्यावा लागतो. अनेक लोक जुने शिक्के, तुकडे आणि दागिने मोडून नवीन सोन्याचे दागिने खरेदी करत आहेत. जुन्या दागिन्यांच्या विक्रीवर जीएसटी, बाजारमूल्य कपात आणि मेकिंग चार्ज हे वजा होते. त्यामुळे ग्राहकांना मिळणारी रक्कम कमी होते. तर नवीन दागिने खरेदी करताना मेकिंग चार्ज १० ते २५ टक्क्यांपर्यंत असतो आणि ३ टक्के जीएसटी द्यावी लागते. १४ एप्रिलनंतर देशभरात लग्न मुहूर्तांची रेलचेल आहे. त्यामुळे सोन्याच्या दागिन्यांची मागणी वाढेल. या काळात जुन्या दागिन्यांची विक्री वाढण्याची आणि नवीन दागिने करण्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# न्या. भूषण गवई होणार देशाचे नवे सरन्यायाधीश

**नवी दिल्ली, दि. १३ :** सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचा वारसा निश्चित झाला आहे. सरन्यायाधीश खन्ना निवृत्त झाल्यानंतर पुढील सरन्यायाधीश म्हणून मूळ महाराष्ट्राचे न्यायमूर्ती भूषण गवई यांचे नाव जवळपास निश्चित झाले आहे. सध्याच्या सेवाज्येष्ठतेनुसार संजीव खन्ना यांच्यानंतर त्यांचाच क्रमांक लागतो. ५१ वे सरन्यायाधीश संजीव खन्ना १३ मे २०२५ रोजी निवृत्त होत आहेत. त्यांच्यानंतर ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांची नियुक्ती केली जाण्याची शक्यता आहे.



राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू न्या. भूषण गवई यांना १४ मे रोजी सरन्यायाधीश पदाची शपथ देतील. भूषण गवई हे भारतीय रिपब्लिकन पक्षाचे दिवंगत नेते, माजी आमदार, खासदार आणि बिहार, सिक्कीम व केरळ राज्यांचे राज्यपाल राहिलेल्या रा.सु. गवई आणि कमलाताई गवई यांचे पूत्र आहेत. न्या. भूषण गवई यांचा जन्म अमरावती जिल्ह्यात २४ नोव्हेंबर १९६० रोजी झाला. मुंबईतून कायद्याची पदवी घेतल्यानंतर त्यांनी १९८५ मध्ये वकिलीला सुरुवात केली. काही काळ त्यांनी मुंबई आणि अमरावतीमध्ये काम केले. त्यांनी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून काम केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात ते न्यायमूर्ती झाले. २४ मे २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती झाले. आता १४ मे २०२५ रोजी ते सरन्यायाधीश पदाची शपथ घेणार आहेत. त्यांना सरन्यायाधीश म्हणून सहा महिन्यांचा काळ मिळणार आहे. ते २३ नोव्हेंबर २०२५ रोजी निवृत्त होतील. सरन्यायाधीश होणारे नागपूर बार असोसिएशनचे ते तिसरे सदस्य आहेत. यापूर्वी न्या. मोहम्मद हिदायतुल्ला आणि शरद अरविंद बोबडे सरन्यायाधीश झाले आहेत.

### फटाका कारखान्यात स्फोट; ८ जणांचा मृत्यू

हैदराबाद, दि. १३ : आंध्र प्रदेशातील अनकापल्ली जिल्ह्यात अवैध पद्धतीने सुरू असलेल्या फटाका कारखान्यात आज दुपारी भीषण स्फोट झाला. यात आठ जणांचा मृत्यू झाला. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी या घटनेच माहिती घेऊन जिल्हा प्रशासन आणि पोलिसांना सूचना केल्या आहेत. बचाव कार्याची गती वाढवा, जखमींना तातडीनं वैद्यकीय मदत उपलब्ध करून द्या, असे चंद्रबाबू नायडू यांनी म्हटले आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार अनकापल्ली जिल्ह्यात कोटावुराटमध्ये अवैध पद्धतीने हा फटाक्याचा कारखाना सुरू होता, आज दुपारी कारखान्यात भीषण स्फोट झाला. या घटनेत सहा जणांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले होते, त्यांना रुग्णालयात नेत असताना त्यांचा मृत्यू झाला. या कारखान्यात तीसपेक्षा अधिक मजूर काम करत होते.

## स्मार्टफोन, लॅपटॉपवर टॅरीफ लागणार नाही

**नवी दिल्ली, दि. १३ :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी टॅरिफ प्रकरणात पुन्हा एकदा घुमजाव केले आहे. अमेरिकेने इलेक्ट्रॉनिक साहित्य जसे स्मार्टफोन्स, लॅपटॉप आणि चिप्सला टॅरिफच्या कॅटेगरीतून बाहेर काढले आहे. म्हणजे आता या साहित्यावर अमेरिकेच्या वतीने रेसिप्रोकल टॅरिफ लावले जाणार नाही. अमेरिकेच्या या निर्णयाने एप्पल, सॅमसंग सारख्या कंपन्यांचा फायदा होणार आहे.

अमेरिकेत स्मार्टफोन आणि इलेक्ट्रॉनिक प्रोडक्टवर टॅरिफ लावल्याने याच्या किंमती वाढण्याची शंका होती. यात जेवढे नुकसान इलेक्ट्रॉनिक कंपन्यांना झाले असते त्याहून अधिक झळ अमेरिकेला सहन करावी लागली असती. यामुळे अमेरिकेने स्मार्टफोन, लॅपटॉप आणि सेमीकंडक्टर वर उलट कारवाई म्हणून टॅरिफ लावण्याचा निर्णय रद्दबातल केला आहे. ब्लूमबर्गच्या अहवालानुसार ट्रम्प यांच्या या नवीन निर्णयामागे इलेक्ट्रॉनिक वस्तूंवर टॅरिफ लावल्याने केवळ किंमतीच वाढतील असे नव्हे तर अमेरिकेच्या टेक्नॉलॉजी कंपन्यांना मोठा फटका बसला असता हे प्रमुख कारण असल्याचे म्हटले जाते. एप्पल आणि डेलसारख्या कंपन्या आपल्या बहुतांशी उत्पादने चीन आणि अन्य आशियाई देशात बनवतात. टॅरिफने किंमती वाढण्याचा मोठा धोका होता. ज्याचा प्रभाव अमेरिकेतील लोकांवर झाला असता. याशिवाय सेमीकंडक्टर इंडस्ट्रीने देखील ट्रम्प प्रशासनावर दबाव टाकला होता. चिप्सची कमतरता ही आधीच जागतिक पातळीवर मोठी गंभीर समस्या आहे आणि नव्या टॅरिफने हे संकट अधिकचे व्यापक केले असते.

# कच्चे तेल चार वर्षांच्या नीचांकी पातळीवर!

### पेट्रोल-डिझेलवर कंपन्यांची प्रति लिटर १५ रुपये कमाई




**मुंबई, दि. १३ :** आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती चार वर्षांच्या नीचांकी पातळीवर (प्रति बॅरल ६५.४१ डॉलर्स) आल्या आहेत. यापूर्वी एप्रिल २०२१ मध्ये किंमत प्रति बॅरल ६३.४० डॉलर्स होती. या घसरणीमुळे, पेट्रोल आणि डिझेल शुद्धीकरणातून मिळणारे उत्पन्न ऐतिहासिक पातळीवर पोहोचले आहे.

रेटिंग एजन्सींनुसार, सध्या तेल कंपन्या पेट्रोलवर प्रति लिटर २-१५ आणि डिझेलवर प्रति लिटर ६.१२ रुपये नफा कमवत आहेत. असे असूनही, तेल कंपन्यांनी गेल्या एक वर्षापासून पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती कमी केलेल्या नाहीत. अलीकडेच, तेल कंपन्या किंमती कमी करतील, अशी शक्यत होती. पण, सरकारने उत्पादन शुल्कात प्रति लिटर दोन रुपयांनी वाढ केली. त्यामुळे कंपन्यांना किंमती कमी करण्यापासून वाचवण्यात आले. गेल्या काही काळापासून, तेल कंपन्या तोट्याचे कारण देत किंमती कमी करण्याचे टाळत आहेत. गेल्या पाच वर्षांत सात मोठ्या तेल आणि वायू कंपन्यांपैकी फक्त एकाच आयओसीला २०१९-२० मध्ये एकदा किरकोळ तोटा सहन करावा लागला. याशिवाय, या कंपन्या वर्षानुवर्षे प्रचंड नफा कमवत आहेत. गेल्या तीन महिन्यांत कच्च्या तेलाची किंमत ६५-७५ च्या दरम्यान राहिली आहे. केंद्र सरकारच्या पेट्रोलियम मंत्रालयाच्या पेट्रोलियम नियोजन आणि विश्लेषण कक्षानुसार, केंद्र आणि राज्य सरकारांनी ५ वर्षांत पेट्रोल आणि डिझेलमधून ३५ लाख कोटी रुपये जमा केले आहेत. केंद्र सरकार पेट्रोलवर प्रति लिटर २२ रुपये कर आकारत आहे. देशात प्रति व्यक्ती सरासरी मासिक पेट्रोलचा वापर २.८० लिटर आहे आणि डिझेलचा वापर ६.३२ लिटर आहे. याचा अर्थ तो दरमहा पेट्रोलवर १०४.४४ आणि डिझेलवर १९३.५८ रुपये कर भरतो.

### सुदानमध्ये भीषण हल्ला, १०० हून अधिक जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली, दि. १३ :** गेल्या अनेक वर्षांपासून अशांत असलेल्या सुदानमधील दारफुर भागात शुक्रवारपासून सुरू असलेल्या हल्ल्यांमध्ये १०० हून अधिक लोक मारले गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मृतांमध्ये २० मुलांचाही समावेश आहे. हा हल्ला रॅपिड सपोर्ट फोर्सेस (आरएसएफ) या पॅरामिलिट्री समुहाने केल्याचे सांगण्यात येत आहे. आरएसएफने एल-फाशर शहर आणि जवळच्या जमजम आणि अबू शौक येथील निर्वासितांच्या तळांवर हल्ले केले.

### मुंबई विमानतळावर ६.३० कोटींचे सोने जप्त

**मुंबई, दि. १३ :** मुंबई विमानतळावर ६ किलो ७३५ ग्रॅम सोने जप्त करण्यात आले. या प्रकरणी अधिकाऱ्यांनी बँकॉकवरुन आलेल्या व्यक्तीला अटक केली. बुटातून सोने आढळून आले. आंतरराष्ट्रीय बाजारात जप्त केलेल्या सोन्याची किंमत ६ कोटी ३० लाख रुपये आहे. हे सोने त्याने ज्या व्यक्तीसाठी आणले होते त्याची माहितीही त्याने अधिकाऱ्यांना दिली.

# बनावट शालार्थ आयडी उपसंचालकाला कोठडी

**नागपूर, दि. १३ :** बनावट शालार्थ आयडीच्या आधारे अपात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पात्र ठरविण्याच्या प्रकरणात नागपूर जिल्हा व सत्र न्यायालयाने नागपूर विभाग शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांच्यासह मुख्याध्यापक पराग पुडके यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या दोघांनाही नागपूर पोलिसांनी शुक्रवारी रात्री अटक केली होती. २०१० मध्ये मुख्याध्यापक पराग पुडके याला शिक्षकपदाचा अनुभव नसताना तसेच शिक्षक म्हणून कोठेही काम केले नसताना थेट मुख्याध्यापक बनविण्यात आले. यासाठी नागपूरच्या एस. के. बी. उच्च प्राथमिक माध्यमिक विद्यामंदिर शाळेत तो शिक्षक असल्याचे बनावट कागदपत्र तयार करण्यात आले. या बनावट कागदपत्राच्या आधारावर उपसंचालक उल्हास नरड यांनी त्याला नानाजी पुडके विद्यालयात मुख्याध्यापक पदावर मंजुरी दिली. त्यापूर्वी त्याचे शालार्थ आयडी तयार करण्यासाठीही मंजूरी दिली होती. या प्रकरणात शिक्षण उपसंचालक, वेतन अधीक्षक, शिक्षणाधिकारी, वेतन निश्चिती अधिकारी तसेच इतर अधिकारी यांनी पैसे घेऊन पुडके यांच्या नावाने बनावट प्रस्ताव तयार केला. विशेष म्हणजे बनावट नेमणुकीच्या या प्रकरणात पालांदूर येथील मुन्ना वाघमारे यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. वाघमारे २०१० पासून नानाजी पुडके शाळेत रंगरंगोटीचे काम करतात. काही महिन्यांपूर्वी ते केंद्रीय शासकीय शाळेत गेले असता पराग पुडके यांना चुकीच्या पद्धतीने मुख्याध्यापक बनविल्यासंदर्भात शिक्षक चर्चा करताना दिसले. या बाबीची विस्तृत माहिती घेतल्यानंतर हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले.

## पान एकवरून

**वंचित, उपेक्षित, गरिब...**

आ. श्रीजया चव्हाण, माजी आ. अमरनाथ राजूरकर, माजी आ. अनंतकुमार पाटील, माजी आ. रामराव वडकुते, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, भाजपाचे जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, किशोर देशमुख, चैतन्यबापू देशमुख, संभाजी धुळगंडे, ॲड. हरिभाऊ शेळके, हाके, प्रवीण साले, माजी जि. प. सदस्य माणिकराव लोहगावे, चंद्रसेन पाटील, गंगाप्रसाद काकडे, एकनाथ धमने, विजय गंभीरे यांची उपस्थिती होती.

प्रा. राम शिंदे म्हणाले, की कमी वयात वरिष्ठ सभागृहाचा सभापती होण्याचा मान पक्षांमुळे मिळाला. शंभर वर्षांच्या इतिहासात एका मागासवर्गीय व्यक्तीस या पदावर काम करण्याची संधी मिळाली आहे. हे पद मोठे आहे, नाव मोठे आहे, पदात गरीमा आहे. तसेच जगात सर्वात मोठी लोकशाही भारतात आहे. सभापतीपद हे संवैधानिक आहे. निश्चित या पदाला न्याय देण्याची माझी भूमिका असणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भक्कम पाठबळ आहे. ते मुख्यमंत्री असताना सोलापूर विद्यापीठाचे नामकरण अहिल्यादेवी होळकर म्हणून करण्यात आले. तसेच अहमदनगर जिल्ह्याचे अहिल्यानगर म्हणून नामकरण केले. मुंबई येथील एका कॅन्सर रुग्णालयाला अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव जिथे येईल त्या ठिकाणी त्या घराण्याचा वंशज म्हणून संवैधानिक मार्गाने काम करण्यास मागे हटणार नाही. नांदेड येथील गोदावरी पुलावरील वळण पुलाचा संवैधानिक प्रस्ताव पाठवा तातडीने तो प्रस्ताव मंजूर करुन नामकरण करण्यास भाग पाडू असे ते म्हणाले. तसेच गुरुद्वारा प्रशासनाला दरमहा ६० लाख वीज बील येत असून त्यांच्या चार एकर जागेवर सोलार पॅनल उभे करण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक नांदेड येथे होणार असून हा कार्यक्रम भव्यदिव्य करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त मंत्रिमंडळाची बैठक चोंडी येथे घेण्याचा निर्णय झाल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बालाजी हसनाळकर यांनी केले. या सोहळ्यास धनगर समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**धनगर समाजाचे प्रश्न...**

त्यांनी सांगितले. नांदेडच्या विकासात्मक कामात कधीच आडथळा आणला नाही. विकासाबाबत सहकार्याची भूमिका आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची व माझी बैठक झाली असून नांदेड जिल्ह्यातील सर्व प्रश्न सोडविण्याची तयारी दाखवली आहे. लवकरच एक बैठक बोलावून सर्व प्रश्न मार्गी लावणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**२०२६ अखेर शेतकऱ्यांना...**

डॉ. पंकज भोयर, खा. अमर काळे, आ. दादाराव केचे, समीर कुणावार, सुमीत वानखेडे, राजेश बकाने आणि अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, की राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचे विविध निर्णय घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु केली आहे. शेतीसाठी १२ तास विजेची शेतकऱ्यांची मागणी होती. यादृष्टीने राज्य शासनाने प्रभावी अंमलबजावणी सुरु केली असून डिसेंबर २०२६ पर्यंत ८० टक्के शेतकऱ्यांना ३६५ दिवस दिवसाला १२ तास मोफत वीज उपलब्ध करुन दिली जाणार आहे. राज्य शासनाने २०२५ ते २०३० पर्यंत राज्यातील वीज वापरकर्त्यांचे वीज बील दरवर्षी कमी करण्याचे नियोजन व तशी कार्यवाही सुरु केली आहे. तसेच ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या मध्यमवर्गीय व गरीब कुटुंबांना सौर ऊर्जेअंतर्गत आणून मोफत वीज देण्यात येईल. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे वर्ध्यासह विदर्भातील दहा जिल्ह्यामधील काही दुष्काळग्रस्त भाग सुजलाम् सुफलाम् होणार असून या प्रकल्पाद्वारे गोसीखुर्द धरणातील ६२ टीएमसी सांडव्याद्वारे नव्याने ५५० किमीची नदी तयार करण्यात येणार आहे. यासाठी एक लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेसाठीच्या सर्व मंजुरी देण्यात आल्या असून योजनेचा अंतिम आराखडा तयार होत आहे. यावर्षाअखेरी किंवा पुढील वर्षाच्या सुरवातीला या योजनेचे काम सुरु होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आर्वी येथील नवीन प्रशासकीय इमारततीचे लोकार्पण झाले आणि १० महत्त्वाचे ई-लोकार्पण व भूमिपूजनही झाले.

**पैनगंगा प्रकल्पग्रस्तांना...**

विभागाकडून दिला जाणार असल्याचे वृत्त आहे. नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील बहुचर्चित निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या (चिमटा धरणा) विस्तारीकरणासाठी स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनींचे २००८ ते २०१० मध्ये वाटाघाटीने भूसंपादन करण्यात आले होते. तब्बल १६ वर्षे उलटूनही शेतकऱ्यांना योग्य मोबदला न मिळाल्याने शेतकरी वाढीव मोबदल्याची मागणी करीत होते. विदर्भातील प्रकल्पाच्या विस्तारीकरणासाठी २००६ ते २०१३ पासून जमीन अधिग्रहणाला सुरवात झाली. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळातर्गत येणाऱ्या नांदेड आणि पैनगंगा नदीवर हा निम्न पैनगंगा प्रकल्प होत आहे. या प्रकल्प क्षेत्रांतर्गत खंबाळा येथील दोनशे हेक्टर जमीन यवतमाळच्या पाटबंधारे विभागाने २००८ ते २०१० यादरम्यान सरळ वाटाघाटीने खरेदी केली होती. निम्न पैनगंगा प्रकल्प क्षेत्रामध्ये जमीन गेलेल्या शेतकऱ्यांनी आधार ओळखपत्र, पासबुक व त्याच्या छायांकित प्रती, शिवाय प्रकल्पात जमीन संपादित झालेले शेतकरी मृत असल्यास त्यांच्या वारसांनी न्यायालयाकडील वारस प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे. आगामी काही दिवसांत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर हा मावेजा वाटप होणार आहे. त्यामुळे बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर...**

करून सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत योग्य तो बंदोबस्त देण्यात आला आहे. जिल्ह्यात दोन अतिरिक्त पोलीस अधीक्षक, सहा उपविभागीय अधिकारी, १५० पोलीस अधिकारी, राज्य राखीव पोलीस दलाची एक कंपनी, १२०० पोलीस अंमलदार, चार दंगल नियंत्रण पथक, १४०० होमगार्ड, असा बंदोबस्त नेमण्यात आला आहे.

जिल्ह्यात ठिकठिकाणी सर्च आणि चेकींग ऑपरेशन राबविण्यात आले. तसेच रेकॉर्डवरील हिस्ट्रीसीटर डिटेन करण्यात आले आहेत. रविवारी जिल्ह्यात ३६ पोलीस स्टेशनंतर्गत अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्यांवर १०१ गुन्हे दाखल करून चार लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच वाहतूक शाखा वजिराबाद व इतवारा यांनी मोटार वाहन कायदा अन्वये मोहिम राबवून फटाका बुलेट व इतर केसेस करून दोन दिवसात आठ लाखांपेक्षा जास्त दंड आकारला. भीम जयंतीनिमित्त डीजे चालक आयोजक मंडळांच्या पोलीस स्टेशन स्तरावर ३० तर उपविभाग स्तरावर १० बैठका घेण्यात आल्या. ३६ पोलीस स्टेशन अंतर्गत शांतता कमिटीच्या बैठका घेण्यात आल्या. तसेच ग्रामीण भागातील पोलीस स्टेशन बिट स्तरावर व गाव पातळीवर पोलीस पाटील, ग्रामसंरक्षक दलाच्या बैठका घेण्यात आल्या. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त निघणाऱ्या मिरवणुकांच्या पूर्ण मार्गाचे ऑडीट करण्यात आले. मिरवणूक मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली असून मिरवणुकीस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही याबाबत काळजी व दक्षता घेण्यात आली आहे. रेल्वेस्टेशनसमोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यास बॅरीकेटींग करून सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन करण्यात आले आहे.

## अवकाळी पावसाने राज्याला झोडपले

**मुंबई, दि.१३ :** राज्यातील अनेक भागांना आज अवकाळी पावसाने झोडपून काढले. काही ठिकाणी गारपीट झाली. गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालं आहे. हातातोंडाशी आलेल्या घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. आज जळगाव जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी गारपिटीसह अवकाळी पाऊस झाला. जळगाव, यावल, चोपडा तालुक्यातील अनेक भागांमध्ये गारपिटीसह जोरदार पाऊस झाला. पुणे जिल्ह्याला देखील पावसाने झोडपून काढले. पुणे जिल्ह्याच्या जुन्नर तालुक्यातील अनेक गावांमध्ये आज वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला.


# चाळीसीचा पारा, घामाच्या धारा, अन् अवकाळीचा इशारा

**नांदेड,दि.१३ (ता.प्र.)–गेल्या काही दिवसांपासून नांदेड जिल्हयाच्या तापमानात मोठी वाढ झाली आहे. सरासरी जिल्हयाचे तापमान चाळीसीने पार केले आहे. एकीकडे उन्हाची दाहकता अन् दुसरीकडे मात्र घामाच्या धारांनी अंग चिंबचिंब होवू लागले. वातावरण दमट असताना अचानकच हवामान खात्याने जिल्हयात पावसाचा यलो अर्लट जारी केला आहे. साहजिकच जिल्हयातील तापमानात चढउतार होवू लागला आहे. आज दुपारी दोनच्या सुमारास सुसाटयाचा वारा येवून पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या आहेत.**

### दुपारी पावसाच्या हलक्या सरी

**शहरात दुपारी २ च्या सुमारास अचानक वातावरणात बदल निर्माण होवून हलक्या पावसाच्या सरी बरसल्या. प्रारंभी जोरदार वारा आला. व त्यानंतर ५ मिनिट पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या.गेल्या दोन दिवसांपासून वातावरणाच्या बदलामुळे शहराच्या उकाडयात वाढ झाली होती. तापमानाचा पारा ४१ च्या वर पोहोचला होता. अशा परिस्थितीत हलक्या पावसाच्या सरी कोसळल्यामुळे नांदेडकरांना उष्णतेपासून थोडासा दिलासा मिळाला आहे. सुरुवातीला सोसाट्याचा वारा सुटल्यामळे नागरिकांची धावपळ झाली.या वाऱ्यामुळे शहरातील काही भागात दोन तास वीज पुरवठा खंडित झाला होता. हवामान खात्याने गेल्या दोन दिवसापूर्वीच जिल्हयात अवकाळी पाऊस बरसू शकेल. जिल्हयाला येलो अर्लट दिला होता.**

गेल्या काही दिवसांपासून जिल्हयाच्या तापमानात मोठी वाढ झाली आहे. उत्तरेकडून उष्ण वारे येण्यास सुरुवात झाल्यामुळे तापमानाचा पारा चाळीसीवर पोहोचला गेला आहे. त्यामुळे प्रचंड गर्मी होवू लागली आहे.घरामधील पंखे, कुलर दिवसभर फिरु लागले आहेत. रात्रीचे तापमानही दमट वाटू लागी आहे. एकंदरित हवामान खात्याने एक व दोन दिवसात जिल्हयात अवकाळी पाऊस वादळी वाऱ्यासह पाऊस पडेल असा इशारा दिला आहे.



रविवारी सकाळी प्रखन ऊन तापले होते. दुपारी मात्र अचानकच वातावरणात बदल निर्माण झाला आणि वाऱ्यासह काही वेळ पाऊस पडला. वातावरणातील उष्मांक थोडा कमी जाणवला आहे. परंतु पुढील काही तासांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त
# दिव्यांग कुटुंबांना जीवनावश्यक धान्य कीटचे वाटप

**नांदेड,दि.१३–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त नांदेड येथील सामाजिक कार्यकर्ते सुरज सोनेकर यांच्या वतीने दिव्यांग कुटुंबांना एक महिन्याचे जीवनावश्यक धान्य किट वाटप करण्यात आले.

हा उपक्रम नांदेड येथील संत गाडगेबाबा चौकाजवळील साई मंदिर परिसरात पार पडला. या कार्यक्रमाला आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर, माजी नगरसेवक बाळासाहेब देशमुख यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.



नांदेड शहरातील अधिक विविध दिव्यांग व्यक्तींना एक महिना पुरेल इतके राशन किट वाटप करून सुरज सोनेकर यांनी सामाजिक भान जपत एक वेगळा पायंडा पाडला. या प्रसंगी भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे, जयस्वाल , गोल्डन मॅन शंकपाळ, रवी लोहाळे मुखेडकर, परमेश्वर दीपके यासह आदींची उपस्थिती होती.

सामाजिक एकोपा व सहकार्याचा प्रेरणादायी संदेश देणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला आहे.

# १८ तास अभ्यास उपक्रम राबवून मानवंदना

**मुखेड,दि.१३ (ता.प्र.)** कै. गोविंदराव राठोड सांस्कृतिक सभागृह येथे राष्ट्रपिता महात्मा ज्योतीराव फुले व संविधानाचे जनक महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंती निमित्त १८ तास अभ्यास उपक्रमास आ. डॉ. तुषार राठोड यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना संबोधित केले.



यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य दशरथ लोहबंदे ,पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, गटशिक्षणाधिकारी कैलास होनधरणे, गौतम काळे, खुशालराव पाटील, बाबुराव देबडवार, किशोर सिंह चौहान, उत्तम बनसोडे राम पत्तेवार, राहुल लोहबंदे, सुधीर चव्हाण, करण रोडगे, दिलीप चव्हाण, शिवाजी राठोड, विनोद दंडलवाड, यशवंत बोडके, प्रा. रामकृष्ण बदने, वसंत जाधव, डॉ. राहुल कांबळे, आकाश कांबळे, प्रकाश जाधव, गजानन अकुलवाड, विकास चव्हाण, सचिन पवार व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.


# आज जिल्हा परिषदेत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**नांदेड,दि.१३–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी जिल्हा परिषद नांदेडतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता जिल्हा परिषद कार्यालय परिसरातून बँड पथकासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.

या अभिवादन सोहळ्यास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक श्रीमती मेघना कावली प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या वेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मंजुषा कापसे, प्रशांत थोरात, नारायण मिसाळ, अमित राठोड, कार्यकारी अभियंते एस.जी. गंगथडे, ए.एन. भोजराज, राहुल रावसाहेब, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, संवर्धन अधिकारी डॉ. प्रविणकुमार घुले, कृषी अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, माधव सलगर, एस.जे. अडबलवार, दिलीपकुमार बनसोडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# पवनसुत श्री हनुमान जन्मोत्सव साजरा

**किनवट,दि.१३ (ता.प्र.)–** किनवट तालुक्यात ठिकठिकाणी विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवत हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरापासून ते तालुक्यातील गावांपर्यंत भाविकांनी श्रद्धेने आणि भक्तिभावाने या उत्सवात सहभाग घेतला. यावेळी महापूजा, अभिषेक, आरती, महाप्रसाद भंडारा आणि पायी वारी यांसारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.




किनवट शहरातील मुख्य हनुमान मंदिरात पहाटे ४ वाजेपासून महापूजा, अभिषेक आणि आरतीचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी शहरातील ज्येष्ठ आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंदिर परिसर भक्तिमय वातावरणात न्हाला होता. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने हनुमान चालिसा आणि पूजेचा लाभ घेतला.

परिसरातील मारुती मंदिराचा नुकताच सुंदर जीर्णोद्धार करण्यात आला आहे. या मंदिरात महापूजा, अभिषेक आणि महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. नव्याने सजलेल्या या मंदिरात भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. भंडाऱ्यात परिसरातील नागरिकांनी सहभाग घेऊन प्रसाद ग्रहण केला.शहरातील गजानन महाराज मंदिर परिसरातील मारुती मंदिरात भागवताचार्य श्री दिनेश महाराज कुलकर्णी यांच्या पुढाकाराने पहाटे ४ वाजेपासून पूजा आणि अनुष्ठान करण्यात आले. या ठिकाणी भाविक भक्तांची मोठी गर्दी जमली होती. मंदिर परिसरात हनुमान चालिसा आणि भक्तिगीतांनी वातावरण भक्तिमय झाले. तालुक्यातील वडोली येथील संकटमोचन मारुती मंदिरात महाप्रसाद, पूजा आणि अर्चनेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. किनवट, सारखानी, वडोली आणि पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माहूर–किनवट मार्गावरील वाहतूक करणारे भाविकही नेमाने या सोहळ्यात सहभागी झाले.

रोड येथील संकटमोचन मारुती मंदिरात संध्याकाळी महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात परिसरातील महिला आणि पुरुष मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. सुभाषनगर, परिसर, समता नगर, पोलीस क्वार्टर, सरदार नगर येथील नागरिकांनी या भंडाऱ्यात उत्साहाने भाग घेतला.तेलंगणा राज्यातील कोसाई येथील मारोती मंदिरात हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यासाठी किनवट येथील भाविकांचा जथ्था सकाळी पायी वारीसाठी रवाना झाला. त्यांनी कोसाई येथे पोहोचून जन्मोत्सव मोठ्या श्रद्धेने साजरा केला. या पायी वारीत मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले.किनवट तालुक्यातील गोकुंदा, प्रधानसंगवी, बोधडी, कमठाला, घोटी, राजगड, सारखानी, जलधारा, मांडवी, बेल्लारी, मांडवा, मारेगाव यांसारख्या गावांमध्येही हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रत्येक गावात पूजा, अर्चना आणि भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन हनुमानाच्या भक्तीत रंगून गेले.या उत्सवात आमदार भीमराव केराम यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांसह तालुक्यातील विविध मंदिरांना भेटी दिल्या. त्यांनी पूजा–अर्चा करून महाप्रसाद भंडारा ग्रहण केला. त्यांच्या उपस्थितीने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.किनवट तालुक्यात हनुमान जन्मोत्सवाचा उत्साह सर्वत्र पाहायला मिळाला. शहरापासून गावांपर्यंत प्रत्येक ठिकाणी श्रद्धा आणि भक्तीचा संगम दिसून आला. विविध मंदिरांमध्ये आयोजित कार्यक्रमांनी भाविकांना एकत्र आणले आणि हनुमान भक्तीचा जागर केला. या उत्सवाने सामाजिक एकतेचेही दर्शन घडवले.

## महत्त्वाचे



**किनवट : श्री मारुती जन्मोत्सवाच्या निमित्ताने शहरातील मुख्य मारुती मंदिरात आयोजित पूजअर्जा व धार्मिक कार्यक्रमात सहभागी भाजपा माजी शहराध्यक्ष सतीश बिराजदार व मंदिराच पारंपरिक पौरोहित गजानन शिवनकर.**

# इंदिरा गांधी महाविद्यालयात जयंतीनिमित्त विविध उपक्रम

**नवीन नांदेड,दि.१३–**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सप्ताह कार्यक्रम निमित्त भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन आणि ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय सिडको येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र व लोकप्रशासन अभ्यास मंडळामार्फत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सप्ताह कार्यक्रमानिमित्त भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचनाचा कार्यक्रम आणि ग्रंथालयामध्ये ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सौदागर एफ.एम यांनी कार्यक्रमाच्या पाठीमागील भूमिका विशद केली. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे,डॉ. सुलतान बेग उपस्थित होते.या उपक्रमात ग्रंथालय प्रमुख डॉ. शिवराज देशमुख यांनी अतिशय दुर्मिळ आणि महत्वपूर्ण ग्रंथांचे प्रदर्शन ग्रंथालयाच्या वाचन कक्षात करण्यात आले होते.या ग्रंथाचा फायदा विद्यार्थी व शिक्षकांनी घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.हनुमंत भोपाळे यांनी केले.

या उपक्रमात महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# व्यसनमुक्ती जनजागृती पोस्टर प्रदर्शनास प्रतिसाद



**नांदेड,दि.१३–** क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे घेण्यात आलेल्या जयभीम पदयात्रा. यात नशाबंदी मंडळ महाराष्ट्र व सोपानराव तादलापूरकर क्रीडा मंडळ चा सहभाग घेतला होता.या पदयात्रे निमित्त महात्मा जोतिबा फुले पुतळा येथे व्यसनमुक्ती जनजागृती पोस्टर प्रदर्शन घेण्यात आले याचे उदघाटन क्रीडा अधिकारी बालाजी शिर्शीकर, चंदा रावळकर , अर्चूरी जोगदंड, प्रकाश सोनकांबळे, क्रीडा अधिकारीचे मार्गदर्शक, विद्यार्थी, खेळाडू उपस्थित होते. नशाबंदी मंडळ जिल्हा संघटक कैलाश गायकवाड, सोपानराव तदलापूरकर क्रीडा मंडळ सचिव माहेश्वरी गायकवाड साधना गायकवाड. गणेश तदलापूरकर, निलेश तदलापूरकर, प्रथमेश तदलापूरकर इत्यादी उपस्थित होते अशी माहिती डॉ. मनीष कंधारे यांनी माहिती दिली.

# साने गुरुजी रुग्णालयाला महात्मा फुले व जन आरोग्य योजना लागू


**किनवट,दि.१३ (ता.प्र.)–** जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून किनवट येथील साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्रात एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी रूग्णालयाचे प्रमुख डॉ. अशोक बेलखोडे यांनी एक महत्त्वाची घोषणा केली की, आता साने गुरूजी रूग्णालयात महाराष्ट्र शासनाची महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना लागू झाली आहे. या योजनेचा औपचारिक लोकार्पण सोहळा लवकरच आयोजित होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



जागतिक आरोग्य संघटनेच्या 'आरोग्यदायी सुरुवात–आशादायी भविष्य' या यंदाच्या घोषवाक्यावर प्रकाश टाकताना डॉ. बेलखोडे म्हणाले की, जन्मापासून मृत्यूपर्यंत आरोग्याची काळजी घेणे किती महत्त्वाचे आहे, यावर आपण सगळ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे. या संदर्भातच साने गुरूजी रूग्णालयाने एक पाऊल पुढे टाकत ही योजना स्वीकारली आहे.भारत जोडो युवा अकादमीद्वारे संचालित साने गुरूजी रूग्णालय गेल्या ३० वर्षांपासून परिसरातील नागरिकांना अत्यल्प दरात आरोग्य सेवा पुरवत आहे. आता या योजनेच्या माध्यमातून गंभीर आणि अतिगंभीर आजारांवर मोफत उपचार उपलब्ध होणार आहेत. यामध्ये कॅन्सर, हृदयरोग, नाक–कान–घसा यासंबंधीचे आजार, जनरल सर्जरी, स्त्रियांचे आजार, डायलेसिस, लहान मुलांवरील शस्त्रक्रिया आणि आयसीयू सुविधांचा समावेश आहे.डॉ. बेलखोडे यांनी सांगितले की, या योजनेचा लाभ घेण्यासाठी गरजू नागरिकांनी आपली मूळ कागदपत्रे जसे की आयुष्यमान कार्ड, आधार कार्ड आणि राशन कार्ड घेऊन रूग्णालयात संपर्क साधावा.

## राजीव गांधी महाविद्यालयात महात्मा फुले यांची जयंती साजरी

**मुदखेड,दि.१३ (ता.प्र.):** श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह सुरू करण्यात आला आहे. शुक्रवार दि.११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.टी. शिंदे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या प्रतिमाचे पूजन करण्यात आले. यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. माधव बसवंते यांच्या वतीने महाविद्यालयास डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या जीवन व कार्यावर आधारित २५ पुस्तके ग्रंथालयास भेट देण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. सतीश उमाटे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ.आर.बी. कोटलवार तर आभार रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.श्याम मोकले यांनी मानले.





**किनवट : दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागीय कार्यालयाचे व्यवस्थापक प्रदीप कामले हे किनवट रेल्वे स्थानकावर तपासणी करिता आले असता त्यांचे स्वागत किनवट येथील पत्रकारांनी केले यावेळी कचरू जोशी, बालाजी शिरसाठ, के. मूर्ती, गोकुळ भवरे, किरण किनवटकर, संजीत बॅनर्जी, किरण ठाकरे.**

# चैत्र पौर्णिमा उत्साहात साजरी

**नांदेड,दि.१३ :** रेल्वे कॉलनीतील उपासिका रमाबाई सुभाष चंद्रशिवे व बोधीवृक्ष महिला मंडळाच्या वतीने ३१०वी चैत्र पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली आहे.



उपासिका रमाबाई सुभाष चंदनशिवे आयोजित बोधीवृक्ष महिला मंडळ यांच्या वतीने पौर्णिमेचा संकल्प कार्यक्रम येथे घेण्यात आला आहे.प्रारंभी तथागत गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले आहे. यावेळी त्रिसरण पंचशील घेण्यात आले आहे.यावेळी यशवंत ढगे, नगीनाबाई नरवाडे, डी. एन. कांबळे, कृष्णा गजभारे ,सोपान गायकवाड, बाबुराव सोनकांबळे, राधाबाई मेश्राम, लीला गायगवळी, सीमा बनकर ,असावरी बनकर, रमाबाई गजभारे ,ज्योतीबाई सावळे , भाग्य रथाबाई सावते आदींची उपस्थिती होती.यावेळी महिलांनी भीम गीत गायली आहेत तसेच चंदनशिवे यांनी शेर शायरी गाऊन अखेर खिरदान व फळे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली आहे.

# देहदान योध्दा पुरस्काराचे वितरण

**नांदेड,दि.१३–** येथे अर्पण अवयवदान समितीतर्फे येत्या १६ एप्रिल बुधवारी सकाळी १० :३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवनात ३६ व्यक्तीनां देहदान योद्धा पुरस्काराने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली गौरविण्यात येणार आहे.अशी माहिती समितीचे अध्यक्ष माधव अटकोरे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

या कार्यक्रमात माजी खा. डॉ. व्यंकटेश काब्दे,माजी आ. गंगाधर पटणे, ज्येष्ठ मराठी साहित्यिक देविदास फुलारी ,मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, आयुक्त महेशकुमार डोईफोडे, डॉ. शंकराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.निलकंठ भोसीकर, निवृत्त शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, माजी जिल्हा माहिती अधिकारी रामचंद्र देठे, निवृत्त समाज कल्याण अधिकारी बापू दासरी, गोविंद मुंडकर,कमलाकर जमदाडे यांची उपस्थिती लाभणार आहे.

देहदान योध्दा पुरस्कार २०२५ चे मानकरी असे आहेत,वर्षा प्रकाश खरात, कमलाबाई मोहनराव गुलांडे,कामाबाई कमलाकर जमदाडे,शितल अनुप आगाशे, सुजाता विनायक सदावर्ते, संगीता नंदकिशोर जाधव, महानंदा दत्ता तुमवाड, डॉ उर्मिला धूत, एड.नागनाथ बुध्दलवाड,निलाबाई अटकोरे, विश्वनाथ चितोरे,शितल कांबळे डॉ सारिका बकवाड,सुनंदा चंद्रमुनी नरवाडे, भिमराव ईरबाजी तरटे,रंजिता लक्ष्मण गुलांडे, रामेश्वरी मोहन गुलांडे ,कविता सुरेश कलेपवार ,सविता गोपाळराव कौरवार,पुष्पा गंगाधर फिरगवाड, रामराम आनंदराव घुले, भुजंगराव सोनकांबळे, गंगासागर ग्यानोबा सोनकांबळे, ॲड. समता बिराजदार,सुर्यभान कागणे, चंपतराव डाकोरे पाटील, प्रितम भराडिया, कैलास अमिलकंठवार,बसवंत शेषराव मुंडकर, पांडुरंग विठ्ठल हाके,विजय हत्तीअंबीरे, मनोहरराव दवणे,शामलाल लाहोटी, महादेव लालप्पा पटणे,रामेश्वरी गुलांडे ,शंकर मारोतराव पवार,सविता घरत मुंबई,नयुम मंत्री सोलापूर यांचा समावेश आहे.देहदान योध्दा पुरस्कार वितरण सोहळ्यात सामाजिक कार्यकर्ते पदाधिकारी, युवक, युवती, विविध पक्ष आणि संघटना पदाधिकारी,शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी आदींनी उपस्थिती दर्शवावी असे आवाहन जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग यांनी केले .

## सुविचार

या जगामध्ये स्वाभिमानाने जगायला शिका. या जगात आपण काहीतरी करुन दखवायचेच अशी महत्त्वाकांक्षा सदैव तुमच्याकडे असायला पाहिजे. जे झगडतात तेच पुढे येतात. –डॉ.बाबासाहेब आंबेडकर.

### संपादकीय

# सोन्याचे दिवस!

अमेरिकेने सुरु केलेल्या व्यापार युद्धामुळे एकीकडे मंदीचे सावट असतानाच दुसरीकडे गुंतवणूकीचा सर्वाधिक सुरक्षित पर्याय समजल्या जाणाऱ्या सोन्याची मागणी वाढली आहे. सतत पडत असलेल्या शेअर बाजारातून पैसे काढून गुंतवणूकदार सोन्यामध्ये गुंतवणूक करत आहेत. त्यामुळे सोन्याच्या दरावर परिणाम होत आहे. शिवाय काही प्रमाणात अस्थिरता, अनिश्चिततताही निर्माण झाली आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांसह सोने–चांदी बाजारातील व्यापारी सुद्धा संभ्रमात आहेत. भारतात तर रोज चढ–उतार होत आहेत. त्यामुळे गुंतवणूकीच्या दृष्टीने सोन्याकडे पाहणाऱ्यांमध्ये कमालीची अस्थिरता आहे. जागतिक पातळीवर भू–राजकीय तणाव किंवा आर्थिक क्षेत्रात अनिश्चितता असते तेव्हा लोकांना सुरक्षितता हवी असते. त्यामुळे सोन्याची मागणी वाढते. परिणामी सोन्याच्या किंमती वाढतात. जागतिक अर्थव्यवस्थेत ज्यावेळी अशी अस्थिरता निर्माण होते, तेव्हा सोन्याच्या किंमती वाढतात. कारण सोन्याला सेफ हेवन ॲसेट म्हणतात. म्हणजे गुंतवणूकीचा एक अतिशय सुरक्षित पर्याय. गुंतवणूकीचे इतर पर्याय डळमळीत झाले, तरी सोन्याचे मूल्य आणि महत्त्व कमी होत नाही. म्हणून आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार सोन्याकडे हेजिंग स्ट्रॅटेजी म्हणून पाहतात. म्हणजे एका गुंतवणूक पर्यायातून होणारा तोटा भरून काढण्यासाठी दुसऱ्या पर्यायात गुंतवणूक करणे. म्हणजे शेअर बाजारात तोट्याची भीती असेल, तर सोन्यात गुंतवणूक केली जाते. आणि ही अनिश्चितता कशामुळे निर्माण होऊ शकते, तर केंद्रीय बँकांचे व्याजदराबद्दलचे धोरण किंवा एखाद्या क्षेत्रातील कंपन्यांच्या कामगिरीचा वा दुसऱ्या घटनेचा शेअर बाजारांवर झालेला परिणाम. सध्या अमेरिकेने सुरु केलेले व्यापार युद्ध भडकले आहे. चीन आणि अमेरिकेत लवकर तोडगा निघाला नाही तर हे दोन देश तर भिडतीलच शिवाय याचे परिणाम संपूर्ण जगातील बाजारावर देखील होतील. व्यापार युद्ध भडकल्याने जगभरातील सरकारी मध्यवर्ती बँकांनी सोन्याची खरेदी वाढवली आहे. तर चीनमध्ये गोल्ड ईटीएफमध्ये गुंतवणुकीला जोर चढला आहे. सध्या गुंतवणूकदार सोन्यातील गुंतवणूक फायदेशीर मानत आहेत. तज्ज्ञांच्या मते येत्या काही दिवसांत सोन्याच्या किंमतीत अजून वाढ होऊ शकते. डोनाल्ड ट्रम्प यांनी औषधी उत्पादनांवर मोठा कर लादण्याचे मनसुबे जाहीर केल्यानंतर मंदीचा धोका आणखी वाढल्याचे मानले जात आहे. त्यामुळे गुंतवणूकदार भीतीपोटी शेअर बाजारातून बाहेर पडून सोने–चांदीचा आसरा घेत आहेत. शेअर बाजार कोसळल्याने सोने आणि चांदीची मागणी वाढली परिणामी, मौल्यवान धातूचे भाव गगनाला भिडू लागले आहेत. दुसरीकडे ट्रेझरी उत्पन्नात वाढ झाली तर, कमकुवत डॉलर आणि जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्थांमधील वाढत्या व्यापार युद्धामुळे किंमती कमी राहिल्यामुळे अमेरिकेत सोन्याच्या किंमतीत आणखी वाढ झाली. आता भारतीय रुपयाचे आणखी अवमूल्यन झाले तर भारतात सोन्याचे दर वाढू शकतात. भारतीय सराफा बाजाराचा विचार केला तर आठवड्याच्या शेवटी सोने ९६,४५० रुपयांवर म्हणजे आतापर्यंतच्या उच्चांकी पातळीवर पोहोचले आहे. तज्ज्ञांच्या मते, सोन्याचा भाव एका आठवड्यात एक लाख रुपयांपर्यंत पोहोचू शकतो. भारतात २०२५ या वर्षातील अवघ्या साडेतीन महिन्यांत सोन्याने आतापर्यंत २० वेळा उच्चांकी पातळी गाठली आहे. दुसरीकडे, काही तज्ज्ञांच्या मते सोने एक लाख रुपयांवर पोहोचण्यासाठी बराच वेळ लागेल. काही जाणकारांचे म्हणणे आहे, की सोन्यातील वाढ ही सध्याच्या ट्रेंडचा विस्तार आहे, नवीन तेजीची सुरुवात नाही. कोणत्याही नवीन कारणाशिवाय पुढच्या आठवड्यात सोन्याचा भाव एक लाखाचा आकडा गाठणे कठीण आहे. नेमक्या याच मतप्रवाहामुळे ग्राहक आणि व्यापारी सध्या संभ्रमावस्थेत आहेत. दुसरीकडे याच काळात आंतरराष्ट्रीय बाजारात, कमी मागणीमुळे कच्च्या तेलाच्या किंमती कमी झाल्या आहेत. हे कमकुवत आर्थिक हालचालींचे लक्षण मानले जाते. यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास डळमळीत झाला आहे आणि बाजारातील घसरणीला वेग आला आहे. आणि गुंतवणूकदार सोन्याकडे आकर्षित झाले आहेत. बाजाराचा हाच कल कायम राहिला तर भाव वाढतील हे ओघाने आलेच. जगातील प्रमुख मार्केट ट्रेडिंग प्लॅटफॉर्म म्हणून ओळखले जाणारे लंडनचे बुलियन मार्केट सोन्याची किंमत ठरवते. मोठे खाणमालक, मोठे उद्योगपती या संघटनेत आहेत. भारत दरवर्षी सरासरी ८०० टन सोने आयात करतो. त्यामुळे भारतात किंमत ठरताना आयातीसाठी लागणारे पैसे शिवाय या आयातीवर लागणारे कर असे मिळून सोन्याची किंमत ठरते. भारताला सोने आयात करताना त्याचे पैसे डॉलरमध्ये भरावे लागतात. त्यामुळे डॉलरच्या तुलनेत रुपयाचा दर किती आहे याचा खूप मोठा प्रभाव या किमतींवर पडतो. शिवाय आयातीवर बेसिक कस्टम ड्युटी, ॲग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट सेस आकारला जातो. आणि सध्याची जागितक अस्थिरता लक्षात घेतली तर सोन्याच्या भावात दीर्घकालीन नाही तर नजिकच्या काळात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात आता सोन्याचे दिवस आहेत हे अधिक महत्वाचे.

हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक शिवानंद दिंगबरराव महाजन द्वारा प्रकाशित आणि मुद्रक संदीप विलासराव पाटील, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड–२
**संपादक : शिवानंद दिगंबरराव महाजन**
**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**
या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.
दुरध्वनी : कार्यालय : २४८५७० संपादकीय विभाग : २४९३५१
फॅक्स : (०२४६२) २४८५७१ र. क्रं. २७९०९/७५.
PR.No.- G2/RNP/NND–२५१/२०१८–२०२०
e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

# क्रांतीसूर्याचा उदय

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म म्हणजे एका क्रांतीसूर्याचा उदय आणि जयंती म्हणजे एक कडाडती युद्धघोषणा पण रक्तविहीन क्रांतीच! बाबासाहेब नावाच्या एका युगनायकाचा उदय महासागराला आलेली आनंदाची भरती होय. शब्दही थिटे पडावेत आणि विशेषणेही गळून पडावीत इतक्या अत्युच्च प्रबुद्ध शिखरांवर विराजमान झालेली बाबासाहेबांची जयंती पिढ्यान् पिढ्या माणसात क्रांतीसौंदर्यच प्रस्थापित करीत आली. जगण्याचं स्फुल्लींग चेतवित आली. हजारो वर्षाच्या गुलामगिरीच्या काळोख्या क्षितिजावर हा भीमभास्कर जन्माला येणे म्हणजे शोषणाचे, विषमतेचे बुरुज उद्धवस्त करीत तमाम चराचर प्रकाशमान करीत जाणे होय.**

------------------------



भीमभास्कर एकदाच उगवत नसतो. तो सातत्यानं मानवी मनाच्या काळ्याकुट्ट अंधारात प्रकाशपालवी म्हणून लखलखत असतो. तो मानवतेच्या सांस्कृतिक प्रदेशात सुंदर मानवी जीवनाची पुनर्रचना करीत मध्यान्हीचा सूर्य म्हणून कायम तळपत असतो. हीच बाबासाहेबांच्या जयंतीची परिभाषा आहे. बाबासाहेबांची ही जयंती नेहमीच नव्या क्रांतीला जन्म देते. म्हणून आजच्या दलित माणसांत आंबेडकरी नवे तेजोगोल जन्माला येतात. नवा जन्म झालेला माणूस दलितत्वाची कात बाजूला काढून टाकतो आणि आंबेडकरी जयंतीचा सोहळा आपल्या रोमारोमांत सामावून घेतो.

बाबासाहेबांची पहिली जयंती त्यांच्या वाढदिवसाच्या रुपाने पुण्यातच सर्वप्रथम १४ एप्रिल १९२८ रोजी जुन्या काळातील एक थोर सामाजिक कार्यकर्ते जनार्दन सदाशिव रणपिसे यांनी साजरी केली. इथूनच बाबासाहेबांच्या भीमजयंतीचा पायंडा पडायला सुरुवात झाली. बाबासाहेबांची प्रतिमा हत्तीच्या अंबारीत ठेवून प्रभात फिल्म कंपनीच्या रथातून, उंटावरुन प्रचंड मिरवणूक काढण्यात आली होती. त्यानंतर प्रत्येक गावागावात, शहराशहरांत भीमजयंतीचे सोहळे सुरु झाले. अत्यंत दबावाखाली राहत आलेल्या लोकांनी जयंतीच्या माध्यमातून व्यवस्थेविरुद्ध रणशिंग फुंकायला सुरुवात केली. भीमसंस्काराने पेटलेला हा तरुण स्वतःचे रक्त सांडायला तयार झाला. जागोजागी बाबासाहेबांचे पुतळे उभे राहू लागले. जिथे धम्मध्वज उभारला ती जमीन रणभूमी म्हणून शिक्कामोर्तब होऊ लागली. देशात असं गाव नाही, जिथं बाबासाहेबाचं नाव नाही, ही चळवळ जोर धरु लागली. पँथरने मर्दानी भीमसैनिक तयार केले. गावातल्या मुख्य रस्त्यावरुन बाबासाहेबांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक वाजत गाजत निघू लागली. बाबासाहेबांची जयंती एखाद्या सणासारखी साजरी होऊ लागली. कामधंद्याच्या निमित्ताने दूर असलेली लोकं, नांदायला गेलेल्या लेकींना जयंतीची आतूर ओढ लागायची. जयंती साजरी करायला गावाकडे परतू लागली. दोन–चार बैलगाड्या नवरीसारख्या पिंपळपानांनी सजविलेल्या त्यात एकीत बाबासाहेबांचे तैलचित्र. एका बैलगाडीत लहान मुले बसलेली. दुसर्या बैलगाडीत लाऊड स्पीकर ठेवलेला त्यामागे तरुण व पुरुष मंडळी चाललेली. बाबासाहेबांच्या जयजयकाराच्या घोषणा. चौथ्या बैलगाडीतही बाबासाहेबांच्या प्रतिमा, लहान मुले आणि लाऊडस्पिकर. शुभ्रवस्त्रे परिधान केलेली मुली, बायका, वृद्ध स्त्रियाही अत्यंत आनंदाने, उत्साहाने मिरवणूकीत सामील होत असत. एकामुखाने जय भीमची घोषणा होई! रस्त्यावरची झाडे, दुकाने, जयंती लांबून पाहणारी सवर्ण माणसे, झाडावरचे पक्षी जणू म्हणत– अरररं घुमतय काय? बाबासाहेबांची जयंती हाय!'

'आपल्या देशाला आंबेडकर बाबा आलाय म्हणं माय!' हे त्या काळच्या वृद्ध स्त्रियांच्या तोंडचे ऐतिहासिक वाक्य. आंबेडकर बाबा कळायला आणि त्यांच्या गावातून जयंती मिरवायला दमनाने आणि शोषणाने खंगून गेलेल्या आमच्या दीन बांधवांना खूप वेळ लागला. जेंव्हा बाबासाहेब थोडे फार कळायला लागले तेंव्हा भीम गीत गायन पार्ट्यांनी जन्म घेतला. आंबेडकरी जलसेकार तयार झाले. तसं आमच्या घरी लिव्हणं कुठं व्हतं? गाणंच होतं. आंबेडकरी प्रेरणेचं साहित्य आणि नव्या विद्रोहाची रंगभूमी बाळसे धरु लागली. बाबासाहेब आसमंतात उद्घोषणारे एक नवे पर्व निर्माण झाले. शाहिरांची, गायकांची, गीतकारांची, कवींची मांदियाळी उदयाला आली. या लोकांनी आपापल्या कलात्मक कार्यकौशल्याने बाबासाहेब प्रत्येक घराच्या दारावर चितारला. कौलारु छतांवर शीलध्वज फडकू लागला. आवाज नसलेली माणसं आता जयभीम, जय बुद्ध, जय भारत बोलू लागली होती. भीमजयंती दरवर्षी नवी प्रभा घेऊन आमच्या महारवाड्याचे बौद्ध वसाहतीत मूल्यांतर घडवायला नव्याने येत होती. ही जयंती ह्या युगानुयुगाच्या हताश जीवनाला प्रफुल्लीत करीत होती. हाती शस्त्र नसलेल्या माणसाला युद्धविद्या शिकवित होती. बाबासाहेबांचं प्रत्येकच गाणं चराचरा मनुची वसाहत कापीत जात होतं. तद्वतच बाबासाहेबांवरची वक्तव्यांची भाषणं वैचारिक परिवर्तनाचा स्वयंदीप चेतवून जात होती. दरवर्षीच येणारी बाबासाहेबांची जयंती हर्षोल्हासासह माणसांना जगण्याचं, झुंजण्याचं अफाट बळ देऊन जात होती.

**प्रज्ञाधर ढवळे**
**मो. ९८९०२४७९५३.**

बाबासाहेबांच्या जयंतीचे स्वरुप अमूलाग्र बदलेले आहे आता ते वैश्विक झाले आहे. केवळ आंबेडकरी अनुयायीच बाबासाहेबांना अभिवादन करतात असे नाही तर देशभरातील तमाम शाळा, महाविद्यालये, शासकीय, निमशासकीय संस्था, खाजगी संस्था, बौद्ध विहारे, सार्वजनिक स्थळे, विद्यापीठे अशा सर्वच ठिकाणी जयंती साजरी केली जाते. यासाठी आता देशभरात सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. एव्हढेच नव्हे तर जगातील ६५ पेक्षा जास्त देशांत बाबासाहेबांची जयंती साजरी केली जाते. त्यापैकी अमेरिका, ऑस्ट्रिया, बहरीन, ब्राझील, डेन्मार्क, बांग्लादेश, मिस्त्र, जर्मनी, ग्वाटेमाला, हाँगकाँग, इंडोनेशिया, इराक, आयर्लंड, सौदी अरब, दक्षिण आफ्रिका, जापान, मेदागास्कर, मंगोलिया, नेपाळ, ओमान, फ्रान्स, श्रीलंका, सेसेल्स, दक्षिण सुदान, स्पेन, स्विर्त्झलँड, टांझानिया, ग्रेट ब्रिटन, लंडन, युक्रेन, कॅनडा, हंगेरी, म्यानमार, कुवैत, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, न्युझीलंड, थायलंड, चीन, पाकिस्तान, दुबई, कॅलिफोर्निया, सॅन फ्रान्सीस्को हे प्रमुख देश आहेत. ही सगळी महानता बाबासाहेबांच्या नावावर आहे, हे आजच्या अनुयायांनी लक्षात घेतले पाहिजे.

बाबासाहेबांची जयंती साजरी करताना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन केले जाते. पुतळ्याला पुष्पहार घालून, अन्नदान करणे, पाण्याची व्यवस्था करणे, व्याख्यानांच्या कार्यक्रमाचे आयोजन करणे, विविध स्पर्धांचे आयोजन तसेच सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, मिरवणुकीत सहभागी होणे, भव्य देखाव्यांचे आयोजन करणे, अठरा तास अभ्यास उपक्रम राबविणे असे किंवा यापेक्षाही अधिक भरीव स्वरुपाचे कार्यक्रम राबविले जातात. परंतु जयंतीच्या निमित्ताने सर्वत्र बीभत्सपणा जोर धरू लागला आहे. बाबासाहेबांच्या फोटोचे तर विकृतीकरण आणि विचित्रीकरण सुरू केले आहे. मिरवणुकीच्याच दिवशी पडणारा दारुच्या बाटल्यांचा खच हे सारेच थांबले पाहिजे. कायमचे थांबले पाहिजे. भीमजयंती म्हणजे क्रांतीचा विचार आहे, जयजयकार आहे. जयंतीच्या निमित्ताने येणारा क्रांतीविचार म्हणजे माणुसकीचे मार्गदर्शक तत्त्वेच आहेत. मानवमुक्तीचे तत्त्वज्ञान ऐक्याचे आणि कल्याणाचे संविधान बनून आपल्या हाती येत असते. बाबासाहेबांची जयंती म्हणजे माणसाच्या जगण्याला क्रांती मानणाऱ्या लोकांच्या मनात स्फुल्लींग चेतविणारी कार्यशाळाच होय. सन २०१७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा चौदा एप्रिल हा जन्मदिवस 'ज्ञानदिवस' म्हणून महाराष्ट्रात साजरा करणे हे एकप्रकारचे अभिवादनच होय. संयुक्त राष्ट्रसंघाने १५६ देशांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत बाबासाहेबांचा 'विश्वप्रणेता' म्हणून गौरव केला. ७० वर्षाच्या राष्ट्रसंघाच्या इतिहासात पहिल्यांदाच मार्टिन ल्यूथर किंग, नेल्सन मंडेला यांच्या यादीत या महान भारतीयाला नेऊन बसविले. आणि बाबासाहेबांच्या जयंतीने हे सर्वश्रेष्ठ युद्ध जिंकले. अशा महान डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विश्वक्रांती नायकास त्रिशरण आणि पंचशीलेचे वंदन!



# बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**बो**धिवृक्ष किंवा महाबोधी वृक्ष म्हणजेच 'ज्ञानाचा अखंड वृक्ष...त्या बोधीवृक्षांची छाया...म्हणजे डॉ.भीमराव रामजी आंबेडकर.बाबासाहेब आंबेडकर यांना असंख्य बिरुदांनी, विशेषणांनी संबोधले जाते. तसेच,त्यांना जगभरात बोधिसत्व या उपाधीनेही संबोधले जाते.बोधीसत्व म्हणजे बुद्ध होण्याचा प्रयत्न करणारा व्यक्ती !त्यांच्या लोककल्याणकारी कार्यामूळेच त्यांना बोधीसत्व ही उपाधी प्राप्त झालेली आहे.डॉ.बाबासाहेबांनी आपल्या संपुर्ण जीवनकाळात दहा पारमितांचे पूर्णपणे आचरण केले आहे. विशेष म्हणजे ''बौद्ध'' धर्माची दीक्षा घेण्यापूर्वीच त्यांना बोधिसत्व या उपाधिचे संबोधन मिळाले.

बहिष्कृत भारता–तातील शोषीतांची दयनीय अवस्था,त्यांच्यावरील प्रचंड अन्याय अत्याचार,कमालीची अज्ञानता,निरक्षरता पाहून पेटून उठलेला अंगार म्हणजे डॉ.भिमराव आंबेडकर,स्त्रीयांवर होणारे अमानुष अत्याचार.माणुसअसुनही जनावरागत जीणं,समाजव्यस्थेने जाणीवपुर्वक सर्व हक्क नाकारलेले...या जगण्याला काहीच आर्थ नाही...प्रत्येकाला मनाजोग जगण्याचा अधिकार आहे या विचाराने धगधगत्या अग्नीकुंडात स्वहिताचे बलिदान देऊन आपले आयुष्य दलित, पीडित, वंचितांसाठी प्राण–पणाला लावून पुकारलेला लढा पाहाता हे कार्य एवढे सोपे नव्हते!कायदेतज्ञ असतांनाही पदोपदी त्यांना जातीच्या नावाने छळ केला गेला...पण या सर्व गोष्टींना भीक न घालता त्यांनी आपला लढा यशस्वी केला...समस्त दलितांना माणुसपण बहाल करत जगण्याची नवी उमेद प्रदान केली,त्यांचे कार्य खरचं थक्क करणारे आहे. तसेच डॉ.बाबासाहेब हे तथागत महाकारुणिक बुद्धांचे ज्ञान दर्शवितात.त्यांनी दिलेल्या पंचशीलीचे पालन त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत केले.या सर्व गोष्टीमूळे बाबासाहेब बोधिसत्व ठरले.आज त्यांच्या जयंती! निमित्त कोटी कोटी प्रणाम!

**रुपाली वागरे/वैद्य**
**नांदेड**
**मो.९८६०२७६२४१**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे प्राणी प्रेम



**डॉ.**बाबासाहेब आंबेडकरांनी पाळीव प्राण्यावर माणसासारखीच माया केली आहे. त्यांच्याकडे जेवढी शेती होती, त्या शेतीच्या मशागतीसाठी जेवढे पाळीव जनावरे होती, त्यांची काळजी त्यांनी कशी घेतली, हे सर्व जगासमोर आलेली नाही. पाळीव डॉग ,डॉगी आणि जंगलात त्यांना सापडलेले हरणाचे जखमी पिल्लू पाडस यांची काळजी डॉ. आंबेडकरांनी घेतली. याची ऐतिहासिक नोंद सापडते.

माता रमाईने डॉग टोबी यांची देखरेख केली. एकत्रित कुटुंबीय सदस्यांच्या फोटोमध्ये डॉग टोबीचा फोटो उपलब्ध आहे. पाळीव प्राण्याला कौटुंबिक सदस्यांचा दर्जा देण्याचा हा प्रकार भारतात प्रथमच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लोकांमध्ये रुजवला आहे.

आजारी रमाबाई डॉक्टरांच्या सल्ल्याने सोलापूर जिल्ह्यात बावी या खेड्यात पशुपक्ष्यांच्या मुक्त संचार असलेल्या जंगला शेजारी पुणे ,सोलापूर महामार्गावर डॉ.आंबेडकर यांचे जिवलग मित्र वालचंद कोठारी यांच्या निसर्गरम्य शेतात आरोग्यात सुधारणा करून घेण्याकरता काही महिने राहिल्या. कोठारीच्या गरीब कुटुंबांच्या वस्तीगृहात रमाबाई रमल्या होत्या. डॉ. आंबेडकर यांना भेटण्यास येत राहिले एके दिवशी डॉ. आंबेडकर जंगलात फिरायला गेले ,त्यांचे निसर्गप्रेम किल्ला पाहणे ,तिथे रात्रभर राहणे ,समुद्रकिनारी राहणे, जंगल प्रेमी रमाबाईना याची माहिती होती . डॉ. आंबेडकरांसोबत जंगलात फिरण्यासाठी काही सहकारी होते.


माणसांना पाहून हरणाचा कळप पळाला; परंतु एक हरीण पिल्लू, पाडस पळताना पडले. व जखमी झाले. त्या पाडसाला डॉ. आंबेडकर यांनी जवळ घेतले. घरी रमाबाई जवळ दिले. रमाबाईनी मातेच्या मायेची पाडसाला दिली. पाडस रमाबाईला बिलगले. माता रमाई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ते पाडस मुंबईला येताना कारमधून घेऊन आले. लहानपणी आई गेल्याचे दुःख डॉ. आंबेडकर यांनी अनुभवले होते तसे पाडसाचे होऊ नये ,ही काळजी त्यांनी घेतली. दुर्दैवाने पाडस जास्त दिवस राहिले नाही. डॉ. आंबेडकर याप्रसंगी खूप रडले.बाबासाहेबांचे प्राणी प्रेम पाहून मुंबई येथील त्यांचे शेजारी खूप आश्चर्यचकित झाले. हा प्रसंग तथागताच्या जीवनातील जखमी राजहंशाची मिळता जुळता वाटतो.

**रमेश मोरे**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर दिल्लीत इंडिया गेट जवळ होल्डिंग येथील बंगल्यात सध्याचा टिळक रोड येथे राहत असत त्यांची द्वितीय पत्नी डॉ.सविता आंबेडकर यांच्या सोबत होत्या डॉ.आंबेडकरांनी या काळात घरी एक डॉगी आणली ,तिचे नाव मोहिनी ठेवले मोहिनी हेदेखील कौटुंबिक सदस्य बनली.

वेळात वेळ काढून बाबासाहेब मुलीला वेळ देत एका फोटोत पती–पत्नी सोबत ही मोहिनी पाहायला मिळते. डॉ. आंबेडकरांचे प्राणी प्रेम सुद्धा जगा वेगळे आणि आदर्श असे होते.


तळतळत्या उन्हाळ्याचा कंटाळा आलाय?
तर चलामग जाऊया A/C ऑडिटोरिअम् मध्ये
फिनिक्स सर्कसचा परिवारासह आनंद घेऊया...
आपल्या नांदेड शहरात
फिनिक्स सर्कस
कुसुम सभागृह, व्ही.आय.पी.रोड,नांदेड
31 मार्च ते 14 एप्रिल पर्यंत
रोज 3 खेळ
• दुपारी 3 वाजता
• सायंकाळी 5 वाजता
• सायंकाळी 7 वाजता
BOOK YOUR TICKET
फोन बुकिंग - 9967514355
Online Ticket- bookmyshow


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
संविधानाचे अमृत ७५ महोत्सवी वर्ष
भारतीय संविधानाचे जनक
महामानव
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!
भारतासह संपूर्ण जगालाही प्रेरणादायी ठरलेल्या
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा जपत सर्वसमावेशक,
प्रगत आणि न्याययुक्त महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प करूया.
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
www.mahasamvad.in | MaharashtraDGIPR | MahaDGIPR


B.R. Ambedkar
जगभरातील करोडो लोकांच्या मनावर ज्यांनी आपल्या विचाराने,कार्याने,
कर्तृत्वाने राज्य केले अश्या युगपुरुष ,बोधिसत्व,भारतरत्न,
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
यांच्या १३४ व्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !
शुभेच्छूक : सुरेश हाटकर
जिल्हाध्यक्ष काँग्रेस कमिटी अनुसुचित जाती विभाग नांदेड.
मा.नगरसेवक प्र.मनपा नांदेड.तथा जिल्हाध्यक्ष भिमशक्ती नांदेड.

# जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी महाविहार बावरीनगरच्या विकास कामांचा घेतला आढावा

## अधिकाऱ्यांना कामे वेळेत पूर्ण करण्याचे दिले निर्देश



नांदेड दि. १३ भारतीय बौद्ध ज्ञानालंकार शिक्षण संस्था मुळावा यांच्या अंतर्गत महाउपासक डॉ. एस. पी.गायकवाड यांनी १९८८ साली स्थापन केलेल्या महाविहार बावरीनगर येथे शैक्षणिक, धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून वैज्ञानिक दृष्टिकोन, समता आणि बंधुभावाचा संदेश देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जात आहे. या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाकडून महाविहार बावरीनगरला तीर्थक्षेत्राचा (क) दर्जा प्राप्त झाला आहे.

या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी शासनाकडून ध्यान केंद्र, बहुउद्देशीय सभागृह, भिक्खू व भिक्खूनी निवास, श्रामणेर-श्राविका निवास, भोजन कक्ष, अशोक स्तंभ, संरक्षण भिंत व अंतर्गत रस्ते अशा विविध कामांसाठी प्रशासकीय मान्यता मिळाली असून या कामांचा आढावा घेण्यासाठी ११ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा सुकाणू समितीची बैठक बावरीनगर (दाभड) येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी संपूर्ण परिसराची पाहणी करून चालू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी अशोक स्तंभ, ध्यान केंद्र, प्रशासकीय इमारत यांच्या जागेची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना काम वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच कामांची गुणवत्ता आणि कालमर्यादित पूर्णता यावर स्पष्टपणे लक्ष देण्याचे निर्देश दिले असून, बावरीनगर येथे कायमस्वरुपी पाणी पुरवठा यंत्रणा निर्माण करणे आणि महामार्गावरून येणाऱ्या रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. यासाठी तहसीलदार अर्धापूर, गट विकास अधिकारी व पोलीस निरीक्षक यांना संयुक्त प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीला डॉ.एस.पी. गायकवाड, तहसीलदार देवणीकर, महावितरणचे पंकज देशमुख, पोलीस उपनिरीक्षक विष्णुकांत कहाळे, सरपंच श्रीमती कांचन सूर्यवंशी, उपसरपंच अरविंद पांचाळ, डॉ. भत्ते खेम्म धम्म, डॉ. भत्ते सत्यपाल, डॉ. मिलींद भालेराव, तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल विभागाचे अधिकारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त

# शहरातील वाहतूक मार्गात आज तात्पुरता बदल

## पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्याकडून अधिसूचना जारी

**नांदेड, दि. १३ :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती अनुषंगाने उद्या सोमवारी ( दि.१४ एप्रिल ) शहरातील मुख्य रस्त्याने भव्य मिरवणूक निघणार असल्याने शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी वाहनांच्या वाहतूक व्यवस्थेत एक दिवसासाठी तात्पुरत्या स्वरुपात बदल करण्यात आला असून यानिमित्ताने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्याकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अधिसूचना जारी करण्यात आली आहे. त्यानुसार उद्या सोमवारी सकाळी ९ ते रात्री १२ वाजेपर्यंत शहरातील वाहतूक मार्गात तात्पुरता बदल करून काही पर्यायी वळण मार्ग उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

वाहन चालकांनी उद्या सोमवारी एक दिवस वाहतुकीसाठी पर्यायी मार्गांचा वापर करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

**वाहतुकीसाठी बंद असलेले मार्ग**

- जुना मोंढा- देना बैंक - महाविर चौक- तरोडकर मार्केट वजिराबाद चौक- कलामंदीर- शिवाजीनगर - आय.टी.आय.चौक ते श्रीनगर- वर्कशॉप कॉर्नर पर्यत येण्या - जाण्यासाठी वाहतुक पुर्णपणे बंद राहिल.
- सिडको - हडको - नविन पुल मार्गे जुना मोंढाकडे येणारी वाहतुक येण्या जाण्यासाठी वाहतुक पुर्णपणे बंद राहील.
- रविनगर कौठा गोवर्धन घाट पुलावरुन वजिराबाद चौकातुन वर्कशॉप किंवा शिवाजी पुतळा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाकडे ये-जा करण्यासाठी पुर्ण बंद राहील.
- कविता रेस्टारंट ते जुना मोंढयाकडे जाणारी वाहतुक ये - जा करण्यासाठी पुर्णबंद राहील.
- टिळकनगर चौक - भाग्यनगर कमान ते वर्कशॉप जाणरा रस्ता रहदारीस पुर्णपणे बंद राहील.
- पावडेवाडी नाका ते शासकीय विश्रामगृह कडे जाणारा रस्ता वाहतुकीस ये-जा करण्यासाठी पुर्णपणे बंद राहील.
- गणेशनगर ते वाय पॉईट ते फुले मार्केट जाणारा रस्ता पुर्णपणे बंद राहील.
- हिंगोली गेट - यात्री निवास -चिखलवाडी कॉर्नर-गांधीपुतळा ते शिवाजी पुतळयाकडे जाणारा रस्ता वाहतुकीसाठी पुर्णपणे बंद राहील
- नायगांव, नरसी व वाजेगांवकडुन येणारे वाहने हिंगोली गेट पर्यंत येतील हिंगोली गेट पासून पुढे वाहतुकीसाठी रस्ता बंद राहिल.
- चिखलवाडी कॉर्नर (गांधी पुतळा) ते शिवाजी पुतळाकडे जाणारी वाहतुक येण्या-जाण्यासाठी पुर्णपणे बंद राहिल.

# बिलोली येथे भीम महोत्सवाचे आयोजन



**बिलोली, दि.१३ :** भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बिलोली येथे मंगळवारी भिम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ''आकाशातला भीम तारा'' फेम गुणगुण रणयेवले ही सुप्रसिद्ध गायिका कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण राहणार आहे.

सामाजिक कार्यकर्ते संदिप कटारे यांच्या पुढाकारातून दिं १५ एप्रिल रोजी मंगळवारी भीम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्‌घाटन खा. रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे तर अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक एल. एन. जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी, तहसीलदार गजानन शिंदे, माजी सभापती संजय बेळगे, देगलुरच्या मुख्याधिकारी नीलम कांबळे, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रा शिवाजी पाटील, भिमराव जेठे, पोलीस निरीक्षक अतुल भोसले, सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, महाराष्ट्र मुक्ती मोर्चाचे अंबादास भंडारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी विविध स्पर्धा परीक्षा तसेच उच्च शिक्षणामध्ये नावलौकिक मिळविलेल्या गुणवंतांचा गौरव करण्यात येणार आहे. यामध्ये डॉ सचिन गंगाधर जाधव, डॉ अजय गंगाधर जाधव, डॉ अक्षय गंगाधर जाधव, कु. सुकेशीनी गंगाधर गायकवाड, डॉ उत्कर्षा प्रकाश पोवाडे, कु.श्रावणी मार्तंड जेठे, संजीवनी अशोक गायकवाड आदींचा समावेश आहे. नविन बसस्थानक समोर असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्या जवळ सायंकाळी सहा वाजता कार्यक्रम सुरू होणारं आहे. तरी शहर व तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्य आयोजक संदिप कटारे यांनी केले आहे.

# लोहगाव शिवारात युवकाने घेतला गळफास

**नरसी, दि. १३ :** रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोहगाव (ता.बिलोली ) शिवारातील एका झाडाला मसलगा ता. कंधार येथील युवक विश्वनाथ गोविंद सूर्यवंशी वय १९ वर्ष या तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज दिनांक १३ रोजी उघडकीस आली आहे.

सदरील युवक हा खैरगाव (ता.नायगांव) येथे त्याच्या बहिणीकडे राहत असल्याची माहिती पोलिस सुत्रांकडून मिळाली असून सदर घटनेची माहिती विश्वनाथ सूर्यवंशी यांच्या नातेवाईकांना देण्यात आली नातेवाईक आल्यानंतरच सदर तरुणांनी आत्महत्या का केली असावी हे कारण स्पष्ट होईल असे रामतीर्थ पोलिसांकडून सांगण्यात आले असून हे वृत्त लिहीपर्यंत गुन्हा नोंद झाला नव्हता.

# देगलूर उपजिल्हा रुग्णालयास वॉटर कुलर भेट



**देगलूर, दि. १३ :** स्व. व्यंकूबाई शंकरराव तोटावार यांच्या स्मरणार्थ उपजिल्हा रुग्णालयास गोरगरीब गरजू रुग्णांना उन्हाळ्याची झळ लागू नये म्हणून रुग्णांसाठी दोन एअर कूलर आणि एक थंड पाण्याचे वॉटर कूलर तोटावार परिवार, मलशेटवार परिवार, वरगणटीवार परिवाराच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांच्या उपस्थितीत रुग्णालयास भेट देण्यात आले.

उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांनी वस्तू स्वरूपात रुग्णालयास रुग्णांच्या हितासाठी दान करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत तोटावार, मलशेटवार व वरगंटीवार परिवारांनी रुग्णालयास वस्तू स्वरूपात भेट दिलेआहे.

या प्रसंगी तोटावार, मलशेटवार व वरगंटीवार परिवारातील सदस्य यांच्यासह शहरातील डॉक्टर,पत्रकार, प्राध्यापक आणि व्यापारी मंडळी उपस्थीत होते.

आपल्या प्रिय जणांच्या स्मरणार्थ भेट वस्तू दिल्याबद्दल रुग्णालय प्रशासनाने तोटावार, मलशेटवार, वरगंटीवार परिवारांचे आभार मानले.

## देगलूरात महात्मा फुले यांची जयंती साजरी

**देगलूरः** संविधान जागर ग्रुपच्यावतीने देगलूर येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती प्रा. डॉ. विश्वांभर गायकवाड यांच्या फुले-शाहू-आंबेडकर व आजचा समाज या विषयावर व्याख्यान देऊन साजरी करण्यात आली. प्रारंभी महामानवांच्या प्रतिमेचे पुजन करून डॉ. सुनील जाधव यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा गायन करून अभिवादन केले. मंचावर व्याख्याते प्रा. डॉ. गायकवाड विश्वांभर धर्मा यांच्यासह कार्यक्रम अध्यक्ष मुख्याधिकारी निलम कांबळे तर प्रमुख डॉ. विनायक मुंडे, डॉ. उत्तम इंगोले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, पोलिस निरीक्षक मारोती मुंडे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते. यावेळी आम्रपाली कैलास येसगे, बाशिद भाई, डॉ. उत्तम इंगोले, मुख्याधिकारी निलम कांबळे, पोलीस निरीक्षक मारोती मुंडे यांनी मनोगत व्यक्त केले.

# 'दवंडी' सामाजिक प्रबोधनाचा प्रेरक उद्‌गार : डॉ गोविंद नांदेडे




**लोहा दि १४ :** सौ कुसुम फुलारी यांचा दवंडी हा काव्यसंग्रह सामाजिक प्रबोधनाचा प्रेरक उद्गार असून जीवनदायी अक्षर साहित्याचे ते उत्तम उदाहरण असल्याचे प्रतिपादन राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ गोविंद नांदेडे यांनी केले आहे. ते माळेगाव यात्रा येथे संपन्न दवंडी या कवितासंग्रहाच्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात अध्यक्ष म्हणून बोलत होते. हा कवितासंग्रह म्हणजे सत्य, शिव, सुंदराची आराधना असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

लोहाच्या उपजिल्हाधिकारी अरुणा सांगेवार यांच्या हस्ते या कविता संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी प्रसिद्ध साहित्यिक देविदास फुलारी, उपजिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, ग्रामीण कवी शंकर वाडेवाले, परभणीच्या उपमुख्यकार्यकारी अधिकारी रेखाताई कदम, प्रकाशक दत्ता डांगे, प्रसिद्ध पत्रकार विठ्ठल फुलारी, साहित्यिक पंडित पाटील, बालाजी फुलारी आणि माळेगाव येथील सरपंच सौ. धुळगंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी बोलताना उपजिल्हाधिकारी अरुणा सांगेवार यांनी कवयित्री कुसुमताई फुलारी यांनी घर, संसार सांभाळून हे लेखन कर्तृत्व सिद्ध केल्याचे कौतुक केले. साहित्यिक देविदास फुलारी यांनी कवयित्रीनी अत्यंत अस्सल आणि प्रामाणिक अनुभवाचा लेखाजोखा या कवितासंग्रहात शब्दबद्ध केल्याचे कौतुक केले. उपजिल्हाधिकारी प्रवीण फुलारी यांनी दवंडी हा स्त्री गौरवाचा अभिलेख असल्याचे प्रतिपादन केले. कवयित्री कुसुम फुलारी यांनी आपण जे जे अनुभवले, भोगले त्या साऱ्या भावना या पुस्तकात सांगितल्याचे प्रतिपादन केले.

दत्ता डांगे यांनी प्रकाशक म्हणून आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमास माळेगाव येथील प्रतिष्ठित नागरिक आणि साहित्यिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पांडुरंग घोरपडे यांनी केले तर आभार प्रदर्शन विठ्ठल फुलारी यांनी केले.

# चंद्रकलाबाई कहाळेकर यांचे निधन

**लोहा, दि.१३ :** लोहा शहरातील जेष्ठ महिला चंद्रकलाबाई कहाळेकर यांचे रविवार दि.१३ एप्रिल रोजी




पहाटे ५.३० दरम्यान वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले,दोन मुली नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. विष्णू कहाळेकर, सहशिक्षक मल्लिकार्जुन कहाळेकर आणि पत्रकार संजय कहाळेकर यांच्या त्या मातोश्री तर कैलास कहाळेकर यांच्या त्या आजी होत.

स्व.चंद्रकलाबाई कहाळेकर यांच्या पार्थिवावर रविवारी सायंकाळी ६ वाजता जुना लोहा येथील त्यांच्या शेतात (मळ्यात) शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी माजी आमदार रोहिदास चव्हाण, भाजपचे प्रवक्ते संतोष पांडागळे, माजी जि.प.सदस्य भगवानराव हाके, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम,माजी नगरसेवक गटनेते करिम शेख, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, भाजपचे शरद पवार, शिक्षक नेते हरीभाऊ चव्हाण, शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठू भाऊ चव्हाण, मनसे जिल्हाध्यक्ष गजानन चव्हाण,मैनेजर केशवराव शेटे, सतिश आनेराव, दत्ता शेटे,शासकीय कान्ट्रैक्टर दत्ता वसमतकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईकांसह लोहा पंचक्रोशीतील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सामाजिक समता सप्ताह अंतर्गत स्वच्छता अभियान

**नांदेड, दि. १३ :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह अंतर्गत स्वच्छता अभियान कार्याक्रम पोर्णीमा नगर बुध्द विहार परिसर येथे राबीवण्यात आला. या कार्याक्रमाचे अध्यक्ष सहायक आयुक्त शिवानंद मिनगीरे हे होते व प्रमुख पाहूणे दयानंद वाघमारे, ॲड कसबे हे होते .



या कार्यक्रमाची सुरवात तथागत भगवान गौतम बुध्दाच्या मुर्तीस व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पाहार अपर्ण करुन स्वच्छता अभियान सुरवारत करण्यात आली. सदर स्वच्छता अभियान पोर्णीमानगर परिसरातील नागरीक व अधिकारी कर्मचारी यांनी उस्फूर्तपणे सहभागी होवून पोर्णीमा नगर बुध्द विहार परिसराची स्वच्छता करण्यात आली. सदर स्वच्छता अभियानामध्ये दयानंद वाघमारे नगरसवेक व भिमजयंती मंडळाचे अध्यक्ष संघरत्न निवडगे, दिपक शिराढोणकर, दिपक कसबे, सोहम लोणे सह सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व नागरीक जवळपास १०० ते १५० नागरीकारीक हे स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते . तद्नंतर पोर्णीमा नगर बुद्ध विहार मध्ये सामुहिक संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. सदर स्वच्छता अभियान हे सहायक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांच्या मार्गदर्शना खाली पार पाडण्यात आले.

